# राम प्रहर

रायगड, नवी मुंबई

वर्ष १६ ◆ अंक ६१

www.ramprahar.com

शनिवार, १६ सप्टेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


'एचआयएल' कामगारांच्या उपोषणाला अखेर यश/२

रायगडातील पर्यटनाच्या स्थगित योजनांना चालना/५

राष्ट्रीय वरिष्ठ तायक्वांडो स्पर्धेत महाराष्ट्र संघाला विजेतेपद/८


## कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना टोल माफ



**मुंबई** : गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांना १६ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत पथकर (टोल) माफी देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्या संबंधीचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे. या टोलमाफी सवलतीसाठी 'गणेशोत्सव २०२३, कोकण दर्शन' अशा आशयाचे स्टीकर्स स्वरूपाचे पथकर माफी पास, त्यावर वाहन क्रमांक, चालकाचे नाव असा मजकूर लिहून ते आवश्यक त्या संख्येनुसार परिवहन विभाग, वाहतूक पोलीस/पोलीस, संबंधित प्रादेशिक परिवहन विभाग (आरटीओ) यांनी समन्वय साधून पोलीस ठाणे, वाहतूक पोलीस चौक्या व आरटीओ कार्यालयांमध्ये उपलब्ध करून द्यावेत, असे आदेश देण्यात आले आहेत. हाच पास परतीच्या प्रवासाकरितादेखील ग्राह्य धरण्यात येईल.

# ईडीची मोठी कारवाई

## ऑनलाईन बेटींग ॲपप्रकरणी मुंबईसह देशभरात छापे

**मुंबई : प्रतिनिधी**

सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) मेसर्स महादेव ऑनलाइन बुक बेटिंग ॲप संबंधित प्रकरणात कोलकाता, भोपाळ व मुंबई येथील ३९ ठिकाणी छापे टाकले असून या प्रकरणी सुमारे ४१७ कोटी रुपये किमतीची मालमत्ता गोठवण्यात अथवा जप्त करण्यात आली आहे.

**४१७ कोटींची मालमत्ता जप्त**





या कंपनीचे प्रवर्तक सौरभ चंद्राकर याचे यूएईमध्ये फेब्रुवारी २०२३मध्ये लग्न झाले होते. या विवाह सोहळ्यासाठी २०० कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचे ईडीच्या तपासात निष्पन्न झाले आहे. गंभीर बाब म्हणजे या विवाहात सादरीकरण करण्यासाठी १४ चित्रपट कलाकार व गायकांनी हवालामार्फत रक्कम घेतली होती.

ईडीने या प्रकरणी महादेव ऑनलाईन बेटींग ॲपशी संबंधित विविध राज्यांत ३९ ठिकाणी छापे टाकले. त्यात मुंबईसह भोपाळ, कोलकाता परिसरातील ठिकाणांचा समावेश आहे. छत्तीसगडमधील रहिवासी असलेले रवी उप्पल आणि सौरभ चंद्रकार हे महादेव बेटींग ॲपचे प्रवर्तक असून या कारवाईमध्ये तब्बल ४१७ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

योगेश पोपटच्या माध्यमातून हवाला रॅकेट चालवले जात असल्याचे ईडीच्या तपासात उघड झाले आहे. गोविंद केडिया नावाच्या व्यक्तीच्या घरी १८ लाख रुपयांची रोख रक्कम आणि १३ कोटी रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने ईडीला सापडले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

### बॉलीवूड कलाकारही रडारवर

या प्रकरणी हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्गज कलाकार ईडीच्या रडारवर आले आहेत. अभिनेता टायगर श्रॉफ, नेहा कक्कर, सनी लिओनी, कृष्णा अभिषेक, राहत फतेह अली खान, विशाल ददलानी यांनी दुबईमधील लग्नात सादरीकरण केले होते. याशिवाय भारती सिंग, नुसरत भरूचा, आतिफ अस्लम यांचीही नावे तपासात उघड झाली आहेत. या कलाकारांनी हवालामार्फत पैसे स्वीकारल्याचा संशय आहे. त्यांना याबाबत माहिती होती का याची पडताळणी करण्यासाठी ईडी लवकरच समन्स बजावणार आहे.

# प्रत्येक निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकला पाहिजे -आमदार प्रशांत ठाकूर




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्थानिक स्वराज्य संस्थेपासून ते लोकसभा निवडणूक अर्थात प्रत्येक निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकला पाहिजे. भाजपशिवाय पर्याय नाही अशी स्थिती निर्माण झाली पाहिजे, अशा रीतीने प्रत्येक कार्यकर्त्याने काम करावे, असे आवाहन पक्षाचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. १५) येथे केले.

भाजप उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणीची बैठक आमदार प्रशांत ठाकूर, आमदार निरंजन डावखरे आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील मार्केट यार्ड येथे माझी माती माझा देश, सेवा पंधरवडा, पदवीधर मतदार नोंदणी आणि सरल ॲप या विषयांच्या अनुषंगाने झाली. त्या वेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारच्या माध्यमातून लोककल्याणकारी विविध योजना अमलात आणून देशाला प्रगतिपथावर आणले आहे, असे सांगतानाच पक्षाने दिलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडणे हे आपले कर्तव्य आहे, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी म्हटले तसेच सेवा पंधरवडा, माझी माती माझा देश, पदवीधर मतदार नोंदणी व सरल ॲप अशा विषयांसंदर्भात उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी माझी माती माझा देश अभियानाचे प्रदेश संयोजक आमदार निरंजन डावखरे यांनी पदवीधर मतदार नोंदणीसंदर्भात, तर जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी यांनी सरल ॲप आणि संघटनात्मक जबाबदारी या विषयी मार्गदर्शन केले. जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांनी माझी माती माझा देश अभियान नियोजनासंदर्भात आणि जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सेवा पंधरवड्याविषयी माहिती दिली.

या बैठकीला जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, उपाध्यक्ष वसंत भोईर, जयंत पगडे, रामदास ठोंबरे, निळकंठ घरत, विठ्ठल मोरे, डॉ. कविता चौतमोल, प्रिया मुकादम, सुभाष कदम, सनी यादव, चिटणीस चंद्रकांत घरत, ज्ञानेश्वर घरत, रमेश मुंडे, ब्रिजेश पटेल, विद्या तामखडे, किर्ती नवघरे, प्रदीप देशमुख, कोषाध्यक्ष अभिलाषा ठाकूर, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत, कर्जत मंडल अध्यक्ष राजेश भगत, खोपोली रमेश रेटरेकर, खालापूर प्रवीण मोरे, उरण रवी भोईर, कामोठे रवींद्र जोशी, कळंबोली रविनाथ पाटील, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, आदिवासी मोर्चा जिल्हाध्यक्ष बंडू शिद, फ्रेंडस् ऑफ बीजेपीचे संयोजक नितीन कांदळगावकर, **(पान २ वर..)**

# श्रीरामपूरमध्ये विविध शैक्षणिक उपक्रमांचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुभारंभ





(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**अहमदनगर : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीरामपूर येथील स्व. सौ. साकरबेन करमशीभाई सोमैय्या प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्रात साने गुरुजी मुक्तद्वार वाचनालय आणि अवकाश विज्ञान प्रयोगशाळा सुरू करण्यात आली आहे. त्यांचे उद्घाटन आणि बहुउद्देशीय सभागृहावरील दुसऱ्या मजल्याचे भूमिपूजन 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते, उत्तर विभागाचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी (दि. १५) झाले.

या समारंभास 'रयत'चे व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, जनरल बॉडी सदस्य रावसाहेब म्हस्के, प्रकाश निकम, डॉ. राजीव निकम, सुजित जगधने, बापूसाहेबपटारे, विभागीय अधिकारी तुकाराम कन्हेरकर, मुख्याध्यापिका सोनाली पैठणे, रयत संकुलातील सर्व प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक आदी उपस्थित होते.

## डोंबिवलीमध्ये इमारत कोसळली

**डोंबिवली : प्रतिनिधी**

डोंबिवली पूर्व येथील जुना आयरे रोड परिसरातील एक धोकादायक इमारत शुक्रवारी (दि. १५) कोसळली. विशेष म्हणजे ही इमारत धोकादायक झाल्याने सकाळपासून खाली करण्यात येत होती.

रहिवासी बाहेर पडत असतानाच सायंकाळी ५च्या आसपास इमारत पत्त्याप्रमाणे कोसळली. या इमारतीमध्ये दोन जण अडकले असून त्यांना बाहेर काढण्यासाठी अग्निशमन दल व पालिका प्रशासनाचे शर्थीचे प्रयत्न सुरू होते. अरविंद भाटकर (वय ७०) व गीता लोढा (वय ५४) अशी आत अडकलेल्या नागरिकांची नावे आहेत.

## रोह्यातील युवकाचा रेल्वेगाडीतून उतरताना मृत्यू



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरातील २० वर्षीय युवक सुटीसाठी गोव्याहून मंगला एक्स्प्रेसने येत असताना रोहा रेल्वेस्थानकात उतरताना प्लॅटफॉर्मवर पडला. त्यामुळे तो जखमी झाल्याने रुग्णालयात नेत असताना त्याचा मृत्यू झाला आहे. या दुर्दैवी घटनेमुळे रोह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

गोवा येथे हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स करणारा जिनील गुजर हा विद्यार्थी गणेशोत्सवासाठी रोहा या आपल्या गावी मंगला एक्स्प्रेसने येत होता. ही रेल्वेगाडी गुरुवारी (दि. १४) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास रोहा स्टेशनमध्ये आल्यानंतर जिनील प्लॅटफॉर्मवर उतरताना पडला. अपघातानंतर या युवकाला रोहा येथे प्राथमिक उपचारासाठी नेण्यात आले तसेच मुंबईकडे पुढील उपचारासाठी घेऊन जात असताना त्याची प्राणज्योत मालवली. सुस्वभावी व हुशार असलेला विद्यार्थी अचानक अपघातात गेल्याने रोह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## रायगडात पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

कुलाबा वेधशाळेकडून रायगड जिल्ह्यात १६ व १७ सप्टेंबर असे दोन दिवस पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

गेले काही दिवस पावसाचा लपंडाव सुरू आहे. कधी पाऊस, तर कधी उन पहावयास मिळत आहे. अशातच आता ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय यांनी केले आहे.

## लालबागच्या राजाची पहिली झलक



**मुंबई : येथील प्रसिद्ध लालबागच्या राजाची पहिली झलक शुक्रवारी सर्वांसमोर आली. मुखदर्शन सोहळ्यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ हा नृत्याविष्कार सादर करण्यात आला. यंदा या ठिकाणी रायगडाची प्रतिकृती उभारण्यात आली आहे, जी दिवंगत कला दिग्दर्शक नितीन देसाई यांनी साकारली आहे.**

## खोपोलीतील पाताळगंगा नदीपात्रात एकजण वाहून गेला

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**



खोपोली सिद्धार्थ नगर येथील एक रहिवासी पाताळगंगा नदीपात्रात वाहून गेल्याची घटना घडली आहे. सुधाकर दामू जाधव असे या व्यक्तीचे नाव असून त्यांचे शव शुक्रवारी (दि. १५) सापडले.

खोपोली नगर परिषदेचे कर्मचारी असलेले सुधाकर जाधव हे गुरुवारी दुपारी १२नंतर बाजारपेठेत जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले. ते संध्याकाळपर्यंत घरी न आल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी पोलिसांमध्ये तक्रार दाखल केली. दरम्यान काही जणांनी एक व्यक्ती पाताळगंगा नदीपात्रात वाहून जात असल्याचे पाहिले होते. त्यानुसार शोधमोहीम राबविण्यात आली. गुरुवारी रात्री अंधार झाल्याने शोधमोहीम थांबविण्यात आली होती. शुक्रवारी सकाळी शिळफाटा येथील इको कार स्टँडजवळ शोधमोहीम राबविणाऱ्या सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांना जाधव यांचे शव सापडले. याबाबत खोपोली पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# राजिपतर्फे पर्यावरणपूरक निर्मल गणेशोत्सव स्पर्धा

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सव पर्यावरणस्नेही व आरोग्यदायी साजरा व्हावा या उद्देशाने रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता विभागामार्फत ऑनलाईन गणेशोत्सव स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून जिल्ह्यात पर्यावरणपूरक



वातावरण निर्माण व्हावे, नागरिकांना मंगलमय वातावरणात सण साजरा करता यावा यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायत हद्दीतील गणेश मंडळे, व्यक्ती, संस्था, बचत गट तसेच ग्रामपंचायती यांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे. यासाठी https://tinyurl.com/ganeshraigad२०२३ या गुगल लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे. गणेशोत्सव कालावधीत राबविलेल्या उपक्रमाचे फोटो व व्हिडीओ गुगल लिंकवर अपलोड करावयाचे आहेत. हे फोटो व व्हिडीओ स्पष्ट असावेत. सहभागी मंडळानी निर्माल्य व्यवस्थापन पाणी व स्वच्छताविषयी जनजागृतीसाठी स्लोगन, प्लास्टिक बंदीची जिंगल्स, बॅनर्स, पोस्टरद्वारे जनजागृती करणे, श्रमदानातून परिसर स्वच्छता, वृक्षलागवड, प्लास्टिक संकलन कृत्रिम तलावात गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यासाठी प्रोत्साहन देणे आदी उपक्रम करणे अपेक्षित आहे.

स्पर्धेसाठी तांत्रिक सहाय्य व परीक्षण करण्याकरिता जिल्हा स्तरावरून परीक्षण समिती स्थापन करण्यात आली आहे. स्पर्धेचे निकष पूर्ण करणाऱ्या व उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मंडळांना बक्षीस म्हणून प्रथम क्रमांक पाच हजार रुपये, द्वितीय तीन हजार रुपये व तृतीय क्रमांकासाठी दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल. अधिक माहितीसाठी पंचायत समितीमधील गटसमन्वयक यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

केंद्र शासनाने स्वच्छता ही सेवा अभियान सुरू केले आहे. यामध्ये कचरामुक्त भारत हा उद्देश असून त्याचाच एक भाग म्हणून पर्यावरणपूरक निर्मल गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन रायगड जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागामार्फत करण्यात आले असल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी दिली.




# वृत्तवाहिन्या पत्रकारांवरील बहिष्कार ही घमंडिया आघाडीची हुकूमशाही

## भाजप प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

केवळ आपल्या सुरात सूर मिसळत नाही म्हणून देशातील प्रमुख वृत्तवाहिन्यांवरील नामवंत पत्रकारांवर बहिष्कार टाकून विरोधकांच्या घमंडिया आघाडीने माध्यमस्वातंत्र्याच्या गळचेपीची हुकूमशाही मानसिकता दाखवून दिली आहे, अशी घणाघाती टीका प्रदेश भाजपाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी (दि. १५) केली. भाजप प्रदेश कार्यलयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

भाजप माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते भालचंद्र शिरसाट, पंकज मोदी आदी या वेळी उपस्थित होते. इंडिया आघाडीचा बहिष्काराचा पवित्रा म्हणजे माध्यमक्षेत्राला थेट धमकीचा इशारा असून पत्रकारांनी, पत्रकार व संपादकांच्या संघटनांनी याची गंभीर दखल घेत या हुकूमशाही मानसिकतेच्या विरोधात संघटित आवाज उठवावा, असे आवाहन उपाध्ये यांनी केले.

उपाध्ये म्हणाले की, देशातील नामवंत पत्रकारांवर बहिष्काराची घोषणा करून या आघाडीने माध्यमक्षेत्राला पुन्हा आणीबाणीची आठवण करून दिली आहे. काँग्रेसने नेहमीच माध्यमक्षेत्राचा स्वार्थी गैरवापर केला, नॅशनल हेराल्डचा वापर करून एका कुटुंबाने आपले उखळ कसे पांढरे करून घेतले यांचे उदाहरण देशासमोर आहे असे ते म्हणाले. काँग्रेसने आणीबाणीच्या काळात पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणली होती. आता काँग्रेससोबत फरफटत



चाललेल्या विरोधकांनीही त्याचा कित्ता गिरवल्याची अनेक उदाहरणे उपाध्ये यांनी या वेळी दिली.

आपल्या विरोधातील आवाज दाबून टाकायचा आणि स्तुती करणाऱ्यांचा उदोउदो करायचा ही घमंडिया आघाडीची प्रवृत्ती माध्यमक्षेत्राचाच नव्हे, तर संविधानाचा अपमान करणारी असून भारतीय जनता पार्टी या प्रवृत्तीचा तीव्र निषेध करते, असे उपाध्ये म्हणाले. आणीबाणीच्या काळात शेकडो पत्रकारांना तुरुंगवास भोगावा लागला होता. सरकारविरोधी साहित्याचे प्रकाशन आणि वितरण केल्याबद्दल तीन हजार न्यायालयीन खटलेदेखील दाखल झाले होते, याची आठवण उपाध्ये यांनी करून दिली. काँग्रेसच्या साथीत राज्यात सत्तेत असलेल्या उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री असताना खोटे आरोप लावून एबीपीचे राहुल कुलकर्णी व रिपब्लिक टीव्ही च्या अर्णब गोस्वामींना अटक केली होती, याचे स्मरणही त्यांनी करून दिले.

# ‘एचआयएल’ कामगारांच्या उपोषणाला अखेर यश

## तीन महिन्यांचा पगार एका महिन्यात देणार –सीएमडी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

येथील एचआयएल लि.च्या कामगारांनी आपल्या न्याय हक्कांसाठी सुरू केलेल्या साखळी उपोषणास गुरुवारी (दि. १४) चौथ्या दिवशी यश आले. या वेळी सीएमडी कुलदीप सिंह यांच्या आश्वासनानुसार कामगारांनी साखळी उपोषण तूर्त स्थगित केले आहे.

आठ महिन्यांचा थकीत पगार मिळावा, अडीच वर्षांची पीएफची रक्कम खात्यात जमा व्हावी, निवृत्त कामगारांची ग्रॅज्युईटीची रक्कम मिळावी, पतसंस्थेची रक्कम मिळावी यांसह एकूण २१ मागण्यांसाठी एचआयएल कंपनीच्या कामगारांनी ११ सप्टेंबरपासून साखळी उपोषणास सुरुवात केली होती. कामगारांना लवकरात लवकर योग्य तो न्याय मिळावा यासाठी विविध संघटना आणि राजकीय पक्षांनी उपोषणाला जाहीर पाठिंबा दर्शविला होता. परिस्थिती विदारक होऊ नये यासाठी कंपनीच्या दिल्ली येथील उच्च व्यवस्थापनाने कामगारांशी चर्चा करण्यासाठी सीएमडी कुलदीप सिंह यांना पाठवण्यात आले.

रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शत्रुघ्न माळी यांच्यासमक्ष सीएमडी कुलदीप सिंह यांनी लेखी आश्वासन देऊन उपोषण स्थगित करण्याची विनंती केली. लेखी आश्वासनाप्रमाणे एक महिन्याचा पगार आजच पाठविण्यात येणार असून आणखी दोन महिन्यांचे पगार या महिन्यातील ३० तारखेपर्यंत देण्यात येतील. गणपती फेस्टिवल ॲडव्हान्स गणेशोत्सव काळात किंवा त्यापूर्वी देण्यात येईल. वैद्यकीय अधिकारी व सुरक्षा कर्मचारी सेवेत लवकरच रूजू होतील. त्यामुळे कामगारांनी साखळी उपोषण तूर्तास स्थगित केले आहे.

# प्राणघातक हल्ल्याप्रकरणी आरोपीस सश्रम कारावास

**अलिबाग : प्रतिनिधी**

किरण धर्मा नाईक याच्यावर प्राणघातक हल्ला केल्याप्रकरणी आरोपीस प्रमुख जिल्हा न्यायाधीश राजदेकर यांनी पाच वर्षांचा सश्रम कारावास व ५० हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली शिक्षा ठोठावली. महेश मनोहर पेटारे असे या आरोपीचे नाव आहे.

झिराड येथील सरकारमान्य ताडीमाडी केंदाच्या समोर ८ जुलै २०१८ रोजी किरण धर्मा नाईक व आरोपी महेश मनोहर पेटारे यांच्यात बोलाचाली झाली. महेश पेटारे आणि त्याच्या मित्राने किरणवर चाकूने हल्ला केला. त्यात तो गंभीर जखमी झाला. याप्रकरणी महेश पेटारे याच्याविरुद्ध मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी न्यालयाने महेश पेटारे यांस दोषी ठरवले. त्याचा मित्र अल्पवयीन असल्यामुळे याच्याविरुद्ध दोषारोप कर्जत न्यायालयात दाखल आहे.

या खटल्यात अतिरिक्त शासकीय अभियोक्ता स्मिता धुमाळ यांनी एकूण १३ साक्षीदार तपासले. किरण नाईक, अनुसया नाईक तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार प्रशांत राऊळ, वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्जना जयकर, तपासीक अंमलदार सहाय्यक पोलीस निरीक्षक मेघना आर. बुरांडे यांची साक्ष महत्त्वाची ठरली, तसेच पैरवी अधिकारी सुर्वे, एपीआय प्रिया सायगावकर, हवालदार सचिन खैरनार, पोलीस नाईक ए. ए. जोशी व हवालदार देशमुख यांचे सहकार्य मोलाचे ठरले.

# रोह्यात पोलीस असल्याची बतावणी करीत सोन्याची चेन लंपास

**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा शहरात बुधवारी सकाळी ६५ वर्षीय वयोवृद्ध व्यक्तीला दोन अनोळखी व्यक्तींनी पोलीस असल्याची बतावणी करून वयोवृद्धाच्या गळ्यातील सोन्याची चेन पळवली.

ही घटना पोलिसांना कळताच पोलिसांनी माहिती घेत होते. ते दोन तोतया पळून जात असताना त्यांना पोलिसांची नाकाबंदी ठिकठिकाणी दिसली. नांदगाव, पाली येथे स्थानिक लोकांचे मदतीने जागोजागी पोलिसांच्या सहाय्याने नाकाबंदी करण्यात आली होती. पोलिसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता ते नांदगाव येथील जंगल भागात दुचाकी टाकून पळून गेले. पोलीस त्यांचा युद्धपातळीवर शोध घेत आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात जैवविविधता संवर्धन पेंटिंग प्रदर्शन

**उरण : वार्ताहर**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय व रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे व महात्मा फुले एएससी महाविद्यालय यांच्या समझोता करारानुसार जैवविविधता संवर्धन या विषयावर व्याख्यान व पेंटिंग प्रदर्शन शुक्रवार (दि.१५) आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. मंदा म्हात्रे यांनी केले. तसेच त्यांनी प्रमुख वक्ते प्रा. डॉ. आर. बी. पाटील, डॉ. आमोद ठक्कर,



विभाग प्रमुख प्राणीशास्त्र फुंडे व प्रा. मयूर नाईक, महात्मा फुले महाविद्यालय पनवेल यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. पाहुण्यांची ओळख डॉ. राणी ठाकरे यांनी करून दिली.

प्रा. डॉ. आर. बी. पाटील यांनी, विविध वन्यजीव ज्यामध्ये विविध पक्षी, सर्प, प्राणि, किटक इत्यादींची सचित्र ओळख करून दिली. त्यांची जीवनशैली त्यांची वैशिष्ट्ये त्यांचे आहार आदीची सखोल माहिती दिली. त्याचबरोबर आजच्या २१ व्या शतकाच्या होणाऱ्या बदलामुळे वन्यजीवांवर आलेल्या संकटात आपण त्यांच्या संवर्धनासाठीची आपली भूमिका प्रामाणिकपणे पार पाडूया आणि आपण आपली जबाबदारी पूर्ण करूयात, असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. एस. के. पाटील यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन श्रुती हिरेमठ यांनी तर आभार प्रदर्शन जयश्री कांबळे यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वन्यजीव व पक्षांचे पेंटिंग केलेले प्रदर्शन भरविण्यात आले. प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रा. डॉ. आमोद ठक्कर हस्ते झाले. प्रदर्शनात सुमारे ९० पक्ष्यांचे पेंटिंग्स व त्यांची माहिती याचे प्रदर्शन विद्यार्थ्यांसाठी मांडण्यात आले. पोस्टर प्रदर्शनात डॉ. योजना मुनीव व प्राणीशास्त्र विभागाने विशेष परिश्रम घेतले.

# तळोजातील वृद्ध महिलेची फसवणूक; मंगळसूत्र लंपास

**पनवेल : वार्ताहर**

दुचाकीवरून हेल्मेट घालून आलेल्या अनोळखी इसमाने ६३ वर्षीय वृद्धेला मंगळसूत्र पैशांमध्ये ठेवले तर त्याच्या वजनात वाढ होईल, असे सांगून १४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याचा प्रकार तळोजामध्ये घडला आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

तळोजा फेज-१ येथे राहणाऱ्या मीना मंथराज या चहाच्या टपरीवर गेल्या होत्या. त्या वेळी हेल्मेट घातलेला एक अनोळखी व्यक्तीने चहाच्या टपरीवर आला. त्याने गणेश मंदिर कोठे आहे असे विचारणा गेली. त्याला मंदिर बाजूलाच आहे असे सांगितलेले. त्याने त्याच्याकडे पैसे असून त्याला मंदिरातील गरिबांना दान द्यायचे असल्याचे मीना यांना सांगितले. त्याने खिशातून ५०० रुपयांची एक नोट आणि १०० रुपयांच्या पाच नोटा असे हजार रुपये काढून चहाच्या टपरीवरील टेबलावर ठेवून या पैशांमध्ये मंगळसूत्र ठेवले तर त्याच्या वजनात त्यात वाढ होईल, असे सांगून मीना यांना मंगळसूत्र काढण्यास सांगितले. मंगळसूत्र नोटांमध्ये ठेवले. त्यानंतर त्याने ते पैसे व मंगळसूत्र एका प्लास्टिक पिशवीत ठेवून पसार झाला.

# सिडको मुख्यालयात अभियंता दिन उत्साहात

**पनवेल : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाचे मुख्यालय असलेल्या सिडको भवन येथे शुक्रवारी (दि. १५) अभियंता दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर, सहव्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, शांतनु गोयल, डॉ. कैलास शिंदे, नवी मुंबई व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मुख्य अभियंता आर. बी. धायटकर, सिडको, परिवहन व विमानतळ महाव्यवस्थापक गीता पिल्लई, विशेष प्रकल्प मुख्य अभियंता शीला करुणाकरन, सिडको इंजिनिअर्स असोसिएशन अध्यक्ष सुरेश ठाकूर, उपाध्यक्ष मनोज वाळिंबे, सरचिटणीस संजय नरसापूर यांसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते एम. विश्वेश्वरैय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. अनिल



डिग्गीकर यांनी, एम. विश्वेश्वरैय्या यांची अभियांत्रिकी क्षेत्रातील उज्वल कामगिरी आणि त्यांनी जीवनामध्ये जपलेली मुल्ये यांचा आदर्श अभियंत्यांनी ठेवल्यास ते राष्ट्र उभारणीच्या कार्यामध्ये बहुमोल

योगदान देऊ शकतात, असे प्रतिपादन केले, तसेच सिडकोच्या वैविध्यपूर्ण प्रकल्पांमुळे नवी मुंबईला जे वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. त्यामध्ये सिडकोतील अभियंत्यांचे मोलाचे योगदान असल्याचेही त्यांनी सांगितले. अभियंता दिन कार्यक्रमानिमित्त अद्वितीय कामगिरी स्पर्धेत वैयक्तिक गटात सहाय्यक अभियंता समीर गोडबोले, गौरव हिंगणे आणि परिवहन अभियंता यश हिवरकर यांना पारितोषिक प्रदान देण्यात आले, तर सांघिक गटात अधीक्षक अभियंता पाणी पुरवठा, अधीक्षक अभियंता (विशेष प्रकल्प), अधीक्षक अभियंता (विमानतळ), अधीक्षक अभियंता (गृहनिर्माण-१ व नवीन शहरे) आणि सिडको सामग्री चाचणी प्रयोगशाळा यांच्या संघांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

यानंतर वॉटरप्रुफिंग एक्सपर्ट ॲन्ड कोअर कमिटी मेंबर रविराज शेट्टी, एसीसीई यांनी रेट्रोफिटिंग ॲन्ड वॉटरप्रुफिंग ऑफ स्ट्रक्चर्स या विषयावर सादरीकरण केले.

# स्वच्छतेची शपथ घेऊन मध्य रेल्वेच्या स्वच्छता पंधरवड्याचे उद्‌घाटन

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक नरेश लालवानी यांनी मध्य रेल्वेच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील प्रधान विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वच्छतेची शपथ दिली. १६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण रेल्वेमध्ये स्वच्छता पंधरवडा साजरा केला जाणार आहे.

मध्य रेल्वेचे मुख्यालय आणि सर्व विभागातील रेल्वे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेसाठी वर्षातून १०० तास म्हणजे आठवड्यातून दोन तास स्वच्छतेसाठी देऊन एकेरी वापराच्या प्लास्टिकविरोधात जनजागृती करून स्वच्छतेसाठी आपली बांधिलकी दाखवून देतील. प्लास्टिक बंदीबाबत जनजागृतीसाठी विविध कार्यालये, युनिट्स आणि डेपोमध्ये श्रमदान आणि वृक्षारोपण करण्यात आले तसेच कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.



पान १ वरुन

# प्रत्येक निवडणुकीत भाजपचा झेंडा फडकला पाहिजे

## –आमदार प्रशांत ठाकूर

आध्यात्मिक समन्वय आघाडी संयोजक काशिनाथ पारठे, सोशल मीडिया सेल संयोजक गायत्री परांजपे, आयटी सेल नितेश सोळंकी, भटके-विमुक्त आघाडी संयोजक बबन बारगजे, सांस्कृतिक सेल संयोजक अभिषेक पटवर्धन, ट्रान्सपोर्ट सेल संयोजक सुधीर घरत, प्रज्ञा सेल संयोजक गीता चौधरी, आयुष्यमान भारत सेल संयोजक ज्योती देशमाने, बेटी बचाव बेटी पढाव संयोजक आरती तायडे, व्यापार आघाडी संयोजक कमल कोठारी, उत्तर भारतीय सेल संयोजक संतोष शर्मा, एनजीओ संपर्क आघाडीचे मंदार मेहेंदळे, शिक्षक सेल जिल्हाध्यक्ष के.सी.पाटील, कायदा सेल अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, क्रीडा प्रकोष्ट संयोजक विनोद नाईक, रेल्वे प्रवासी प्रकोष्ट संयोजक उपेंद्र मराठे, पदवीधर प्रकोष्ट संयोजक राजेश कदम, भाजपचे शहर सरचिटणीस अमरीश मोकल, सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# रेवदंड्यात गणेशोत्सावासाठी वाद्यांना चढतोय साज



**रेवदंडा : प्रतिनिधी**

गणेशोत्सव म्हटलं की, भजन, कीर्तन, सामुहिक आरत्या, जाखडी, नाच यांना ढोलकीची साथ नेहमीच वाहवा देणारी आहे. यामुळेच ढोलकीला नवा साज चढविण्यासाठी कारागिर मग्न झाले आहेत.

रेवदंड्यातील लक्ष्मण वाद्यालयात विलास धाटावकर ढोलकी व मृदुंगाच्या दुरूस्तीच्या कामात दंग झाले आहेत. जुनी ढोलकी नवी बनविणे, ढोलकीला लागणारे शाहीपान, शाई लावणे, तबला व मृदुंग भरून देणे आदी कामांची रेलचेल सध्या वाढली आहे. ढोलकी बनविण्यासाठी खैर, शिसव, निम आदी लाकडापासून बनविण्यात येते. दिवसेंदिवस ढोलकीच्या किमती वाढत आहेत. शिवाय कामासाठी प्रशिक्षित कारागीरांचा तुटवडा भासतो.

परप्रांतीय ढोलकी कारागिर ठिकठिकाणी तात्पुरते ढोलकी दुरूस्ती व विक्रीचे दुकान थाटतात. त्यामुळे पारंपरिकरित्या व्यवसाय करणाऱ्यांना याचा फटका बसतो. असे असले तरी ज्यांना ढोलकी, तबला याविषयी खरोखर गंध आहे, असे वाद्यप्रेमी लक्ष्मण वाद्यालयाकडेच दुरूस्तीसाठी येतो. चोख काम, तसेच स्वराचा विश्वास हिच लक्ष्मण वादयालयाची ग्राहकांला पोचपावती असते, विलास धाटावकर यांनी सांगितले.

# पनवेलच्या विद्यार्थिनींची राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई येथे झालेल्या अखिल नटराजम अंतर सांस्कृतिक संघ, आयोजित १०वी अखिल भारतीय सांस्कृतिक राष्ट्रीय नृत्य स्पर्धा आणि महोत्सव या स्पर्धेत पनवेलच्या नृत्य आराधना कलानिकेतन संस्थेच्या विद्यार्थिनींनी चमकदार कामगिरी करून सुवर्ण यश संपादन केले आहे. या सर्व विजेत्या नृत्यांगनांचे विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

मुंबईत ११ ते १४ सप्टेंबर या कालावधीत झालेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत देशभरातून शेकडो स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत पनवेल येथील नृत्यआराधना कलानिकेतन संस्थेच्या संचालिका व प्रशिक्षक गुरु ॲड. दिपिका मनीष सराफ व अमिता सचिन सराफ यांच्या




मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींनी भरतनाट्यम् या नृत्य शैलीच्या सीनियर गटामध्ये तसेच ज्युनिअर गटांमध्ये सुद्धा प्रथम क्रमांक पटकाविला आहे.


यात सिनियर गटात शिवानी पाचरकर, तनया घरत, आरती मोरे, प्रणिता वाघमारे व वैखरी पोटे या स्पर्धकांचा सहभाग होता, तर लहान गटात ओवी नाईक, आदिती सावंत, आर्वी देशमुख, श्रेया कोळपकर, मुग्धा कुलकर्णी, वेदिका भुयार या विद्यार्थिनींचा सहभाग होता. या स्पर्धेमध्ये गुरु ॲड. दिपिका सराफ यांना त्यांच्या सर्वोत्तम नृत्य कोरिओग्राफीसाठी नृत्य अविष्कार अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. सर्व विजेत्यांचे कौतुक होत आहे.

# कोकण विभागात सरासरी सहा मिमी पावसाची नोंद

**नवी मुंबई** : कोकण विभागात १५ सप्टेंबर रोजी सरासरी सहा मिमी पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद पालघर जिल्ह्यात १२.८ मिमी झाली आहे. कोकण विभागात आतापर्यंत एकूण २६८०.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

## दुखवटा

### अ.अजीज शेख



**माणगाव** : महाड काजलपुरा येथील जुने रिक्षा चालक अ. अजीज कादर शेख यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी (दि. १४) ससून रुग्णालय पुणे येथून घरी घेऊन येत असताना वाटेतच निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, चार भाऊ, दोन बहिणी, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शेख कुटुंबियांवर व त्यांच्या समस्थ नातेवाईकांमध्ये शोककळा पसरली आहे.

## निवडक



### सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**पनवेल** : तालुका नाभिक समाज मंडळ यांनी श्रीसंत सेना महाराज पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ जाधव यांनी सेना महाराजांच्या अभंग संपदेविषयी त्यांनी विवेचन केले. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या दीपप्रज्ज्वलनाने झाली. संत श्रीसेना महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून सामुदायिक आरतीचा सोहळा झाला. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र भालेकर, प्रमुख पाहुणे राजकुमार ताकमोगे, ज्येष्ठ नागरिक पंढरीनाथ दळवी, ओबीसी सहचिटणीस व संस्थेचे उपाध्यक्ष छगन सोळंकी, संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब चातुर्य, सचिव राजेश नगरकर, संस्थेचे उपाध्यक्ष पंडित, दत्तात्रय जाधव, रमेश चव्हाण, नरेश देवडा, छगन परमार, कृष्णा मगर, दिलीप मगर, अनंता पवार, बाबू पवार, अशोक साळुंके, यशवंत आहेर, राजन शेलार आदी उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी सेना महाराजांच्या विचारांविषयी आपले मनोगत व्यक्त केले.

### कळंबोलीतील महिलांचा शिवसेनेत प्रवेश




**पनवेल** : शेकडो महिलांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केल्याने पक्षाची ताकद कळंबोली वसाहतीमध्ये वाढल्याचे प्रतिपादन जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे यांनी केले. शिवसेनेच्या कळंबोलीच्या मध्यवर्ती कार्यालयामध्ये पार पडलेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात कळंबोलीमधील बहुसंख्य महिलांनी प्रवेश केला. या वेळी जिल्हाप्रमुख कुंदा गोळे, तालुकाप्रमुख संध्याराणी पाटील, शहरप्रमुख ज्योती पाटील, शहर संघटक आनंदा माने, शहर प्रमुख श्रीकांत फाळके यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांनी प्रवेशकर्त्या महिलांचे पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

### अत्याचारप्रकरणी आरोपी ताब्यात

**पनवेल** : १३ वर्षीय मुलीवर अत्याचार करणाऱ्या ५० वर्षीय आरोपीला पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे. अल्पवयीन मुलगी ९ सप्टेंबर रोजी घरातून निघून गेली. त्यामुळे तिचे अपहरण केल्याचा गुन्हा पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. ही मुलगी करंजाडे येथे सापडली. तिच्याकडे अधिक चौकशी केली असता तक्का दर्गाजवळ राहणारा रामकुमार बलकरण पांडे हा तिच्यासोबत लैंगिक अत्याचार करीत असल्याचे तिने सांगितले व त्याला वैतागून ती घर सोडून निघून गेली होती. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांनी आरोपी रामकुमार पांडे याला अटक केली आहे.

## इंडियन स्वच्छता लीग २.०
# पनवेल मनपाच्या उपक्रमाचे उद्घाटन

### ‘पिल्लई’च्या विद्यार्थ्यांनी बनवली प्रतिकात्मक मानवी साखळी




**पनवेल : प्रतिनिधी**

स्वच्छ भारत अभियानांतर्गत आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेच्या वतीने इंडियन स्वच्छता लीग २.०चे उद्घाटन पिल्लई आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयात शुक्रवारी (दि. १५) करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी फ्लॅश मॉबच्या माध्यमातून आयएसएल २.० नावाची प्रतिकात्मक मानवी साखळी तयार केली.

या वेळी घनकचरा व आरोग्य विभा्ग प्रमुख अनिल कोकरे, आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन वाडेर, प्रा. किरण देशमुख आदी उपस्थित होते.

उपायुक्त सचिन पवार यांच्या सूचनेनुसार झालेल्या कार्यक्रमामध्ये महापालिकेच्या वतीने इंडियन स्वच्छता लीग २.० ही स्वच्छ भारत अभियन अंतर्गत कचरामुक्त शहरांसाठी होणाऱ्या कार्यक्रमामध्ये तरूणांचा सहभाग होण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

‘इंडियन स्वच्छता लीग २.०’ ही स्वच्छ भारत अभियानांतर्गत रविवारी (दि. १७) सेवा दिवस या भारतीय स्वच्छता लीगच्या दुसऱ्या आवृत्तीने पंधरवड्याची सुरुवात महापालिका चारही प्रभागामध्ये इंडियन स्वच्छता लीग २.० रॅलीने करणार आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते एक हजार पुस्तकांचे लोकार्पण




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या शिक्षणाचा आणि बुद्धिमत्तेचा उपयोग समाजासह देशाच्या उद्धारासाठी करणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कळंबोली शहरात अभ्यासिका भवन सुरू झाले आहे. या अभ्यासिकेतून बहुजन समाजातील मुले मोठ्या हुद्द्यावर आणि उच्चपदस्थ अधिकारी व्हावी या दृष्टिकोनातून पनवेल तालुका भिमशक्ती संघटनेच्या वतीने एक हजार स्पर्धा पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या पुस्तकांचे लोकार्पण भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. १५) झाले.

या पुस्तकांच्या लोकार्पण सोहळ्यास भाजपचे जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, अमर पाटील, राजू शर्मा, कळंबोली सरचिटणीस दिलीप बिस्ट, विष्णू गायकवाड, आबा घुटुगडे, प्रकाश शेलार, पनवेल तालुका भिमशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुषाभ गायकवाड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

अभ्यासिकेत युपीएससी, एमपीएससी, इंजिनिअरिंग सरळ सेवा, पोलीस भरती, तलाठी, ग्रामसेवक तसेच बँकिंग क्षेत्रातील पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

# फुंडे ग्रामपंचायतीकडून १५ दिव्यांगांना निधीवाटप

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील फुंडे ग्रामपंचायत हद्दीतील १५ दिव्यांग नागरिक व महिलांना सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील दिव्यांग निधी प्रत्येकी २० हजार रुपये धनादेशाच्या स्वरूपात वाटप करण्यात आले. जीवनावश्यक वस्तू खरेदीसाठी व लाभापोटी फुंडे ग्रामपंचायतीचे सरपंच सागर घरत यांच्या हस्ते व ग्रामविकास अधिकारी सातंगे यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले.

या वेळी ग्रामपंचायतीच्या वतीने येथील दिव्यांग व्यक्तींना ग्रामपंचायत फंडातून निधी उपलब्ध करून दिल्याने दिव्यांग नागरिक व महिला लाभार्थी यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य दिसत होते. गणपती सणासुदीच्या पूर्वसंध्येला या निधीच्या धनादेशाचे वाटप झाल्याने ग्रामपंचायतीचे सरपंच उपसरपंच सदस्य आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांनी कर्तव्य बजावण्याचे कार्य पाडल्याने दिव्यांगांना गणपती सणात आवश्यक वस्तूंची खरेदी करता येणार असल्याने उपस्थित सर्वच दिव्यांगांनी आनंद व्यक्त केला आहे.



# निरोगी आरोग्यासाठी प्रयत्न करावे -अरुणशेठ भगत

## रिटघर येथे विद्यार्थ्यांसाठी आरोग्य शिबिर



(छाया : प्रफुल्ल कांबळे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपले आरोग्य कशाप्रकारे निरोगी जगण्यासाठी पालक आणि विद्यार्थ्यांनी प्रयत्न करावे, असे प्रतिपादन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी रिटघर येथे शुक्रवारी (दि. १५) आरोग्य शिबिराच्या उद्घाटनावेळी केले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयातील एनसीसी युनीट आणि नवी मुंबई अपोलो हॉस्पिटलच्या वतीने रिटघर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर ज्युनियर कॉलेजमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ रहावे म्हणून या आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून याचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी झाले.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, प्रा. डॉ. डी. डी. आघाव, डॉ. एस. एन. परकाळे, अपोलो हॉस्पिटलच्या डॉ. स्मिती कुमारी यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.



**पनवेल : शिवसेनेचे महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध लेखक डॉ. सच्चिदानंद शेवडे यांच्या ‘बाप्पा मोरया’या पुस्तकाच्या नवीन आवृत्तीचे प्रकाशन शुक्रवारी करण्यात आले. या वेळी भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शिवसेनेचे जिल्हा सल्लागार रमेश गुडेकर, ज्येष्ठ नेते चंद्रशेखर सोमण, शहरप्रमुख प्रसाद सोनवणे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी पत्रकार संजय कदम यांना वाढदिवसानिमित्त पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी नगसरेवक तेजस कांडपिळे, शिवसेना उपमहानगर प्रमुख महेश सावंत, उद्योजक सतीश मोरे, युवा नेते उमेश इनामदार आदी उपस्थित होते.**

## कराडे खुर्द ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी
# भाजपच्या मिनल ठोंबरे बिनविरोध


**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा अतिरिक्त एमआयडीसी परिसरातील कराडे खुर्द ग्रामपंचायतीच्या उपसरपंच प्रमिला पाटील यांनी पदाचा राजीनामा दिल्याने निवडणूक शुक्रवारी (दि. १५) झाली. उपसरपंचपदासाठी भाजपच्या मिनल ठोंबरे यांचा एकमेव अर्ज आल्याने सरपंच भारती चितळे यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक अधिकारी निवृत्ती आंधळे यांनी उपसरपंचपदी त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.



या वेळी मिनल ठोंबरे यांचे सरपंच भारती चितळे, ग्रामसेवक निवृत्ती आंधळे, हभप अनंता मोरे, ज्येष्ठ समाजसेवक काशिनाथ माळी, ग्रामपंचायत सदस्य मुकेश पाटील, यशश्री मुरकुटे, नलिनी कारंदे, नितेश कारंदे, माधुरी चितळे, संतोष म्हात्रे, रेवती भोईर, प्रमिला पाटील, पोलीस पाटील सुजाता माळी, माजी सरपंच किरण माळी, तानाजी पाटील, विजय मुरकुटे, रविंद्र चिंतळे, विजय चव्हाण, माजी उपसरपंच विलास माळी, प्रकाश माळी, भानूदास माळी, विश्वनाथ गायकवाड, धनाजी ठोंबरे, राजा सोनावणे, संतोष जाधव, संदिप पाटील, महादेव कांबळे, वामन पाटील आदींनी अभिनंदन केले.

# कार्यशाळांमध्ये कारागिरांची गणेशमूर्ती सजवण्याची लगबग



**उरण : वार्ताहर**

गणेशोत्सवानिमित्त बाजारात विविध प्रकारच्या मूर्ती दाखल होत आहेत. बाप्पाला आकर्षक रोषणाई, उत्तम देखाव्यांबरोबर आकर्षक असा फेटा आणि धोतर परिधान करून सजवण्याचा ट्रेंड अधिक आकर्षण ठरत आहे.

गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक राहिले असल्याने उरण बाजारात उत्साह संचारला आहे. विविध रूपातील गणेशमूर्ती विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. कार्यशाळांमध्ये मूर्तिंवर शेवटचा हात फिरविण्याचे काम केले जात आहे. सध्या फेटा असलेले गणरायाच्या मूर्ती भाविकांना अधिकच भावत आहेत. त्यात काठापदराच्या वस्त्रांना सर्वाधिक मागणी आहे. यंदा सजावटीसाठी काठीयावाडी, श्रीकृष्ण, गुजराती, पारंपरिक, महाराष्ट्रीयन विविध प्रकारच्या फेट्यांनी मागणी असून यावर्षी बाजारात वेल्व्हेट धोतर आणि पर्यावरणपूरक गणेशमूर्तींना मागणी वाढली आहे. त्याचबरोबर गणेशमूर्ती बनवताना आणि विक्री करताना त्याचे पावित्र्य राखणे ही प्रत्येक मूर्तिकाराची जबाबदारी आहे. त्यामुळे मूर्ती साकारताना विशेष काळजी घेतली जात आहे.

गेल्या ४० वर्षांपासून किशोर जगे यांचे सिद्धीविनायक कलाकेंद्र असून गणेशभक्त येऊन मूर्ती पसंत करतात. दागिने सजविण्याचे काम सुरू आहे, असे सौ. जगे यांनी सांगितले.

# गव्हाण विद्यालयात हिंदी दिनानिमित्त विविध उपक्रम

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये राष्ट्रीय हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमामध्ये प्रारंभी आस्था गोंधळी, अल्पेश पाटील, जीविका कोळी, यश राठोड या विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेतील कविता सादर केल्या, तर विनीशा पाटील, स्मित मोकल या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक व हिंदी विभाग प्रमुख एकनाथ ठाकूर, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, उपशिक्षक सागर रंधवे यांनी हिंदी भाषेचे महत्त्व विशद केले.

उपप्राचार्य प्रमोद मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, हिंदी भाषा विभाग प्रमुख एकनाथ ठाकूर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, हिंदी विषयाच्या अध्यापिका सुजाता शेलार-चौधरी, करावकर सर, संपदा म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, इतर शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. बालकवितेच्या सादरीकरणाबद्दल यश राठोड याचा सत्कार करण्यात आला.



# बोंदारपाडा येथे वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषदेच्या वतीने पनवेलजवळील बोंदारपाडा या दुर्गम भागात वृक्षारोपण करण्यात आले. बोंदारपाडा येथे प्रवेश करतानाचा जो रस्ता आहे, त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला ठराविक अंतरावर काजू, बदाम, जांबूळ, पळस, मुचकंड, चिंच, पिंपळ, तबेबुजा, ताम्हण, पिवळा व लाल गुलमोहोर, कांचन, कडूनिंब, कैलासपती, मोहगनी या वृक्षांचे रोपण करण्यात आले, तसेच वृक्ष संरक्षणार्थ कुंपण व्यवस्थादेखील करण्यात आली.



पाड्यातील प्रत्येक घरासमोर आंब्याची झाडे लावण्यात आली. या उपक्रमाला पनवेल शाखेचे ग्रामविकास प्रमुख बालाजी राव, शुभा राव तसेच पर्यावरण प्रमुख योगेश शहा व शुभांगी शहा तसेच बोंदारपाडा येथील सर्व रहिवासी बांधवानी मोलाचे योगदान दिले. परिषदेच्या सदस्य संकलन निधीतून हा उपक्रम पार पाडला. बोंदारपाडा येथे भारत विकास परिषदेचे काही उपक्रम सुरू आहेत आणि येथील रहिवाशांचे वृक्षांप्रती असलेले प्रेम, गरज व वृक्ष जगवण्याची मानसिक तयारी करून व ओळखून संस्थेने या उपक्रमाचे अभ्यासपूर्ण नियोजन केले आणि त्यांच्याच मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वी केला, अशी माहिती सचीव पद्मजा कुलकर्णी यांनी दिली.

# मुंबई-गोवा महामार्गावर ४०० पोलीस बंदोबस्तासाठी तैनात

**पेण : प्रतिनिधी**

रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे व अप्पर पोलीस अधिकारी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था तसेच मुंबई-गोवा, खोपोली मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये याबाबत सर्व तालुक्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी, वाहतूक पोलिसांची बैठक पेण (वडखळ) येथे घेण्यात आली.

या वेळी चाकरमान्यांच्या सुखकर प्रवासासाठी तीन दिवस रायगडमधील ४००हून अधिकारी व अंमलदार हे तैनात असणार आहेत, तर गणेशभक्तांच्या सुरक्षेसाठी १० सुविधा केंद्र, पोलीस व वाहतूक पोलीस यांना जॅकेट, रिफ्लेक्टर, बॅरिकेट, आधुनिक मॅपद्वारे दिशादर्शक तक्ते आदी सुरक्षतेची साधने देऊन रायगड पोलीस गणेशभक्तांच्या सुखकर प्रवासाठी सज्ज झाले असल्याचे रायगड पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी सांगितले.



पोलिसांच्या सुरक्षेसाठीही साधने

अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनीदेखील मुंबई-गोवा महामार्गावर बंदोबस्ताबाबत उपस्थित पोलीसांना मार्गदर्शन केले. या वेळी पेणचे डीवायएसपी शिवाजी फडतरे, अलिबाग डीवायएसपी अरुण भोर, कर्जत डीवायएसपी विजय लगारे, रोहा डीवायएसपी सोनाली कदम, खालापूर डीवायएसपी विक्रम कदम, डीवायएसपी मुख्यालय संजय सावंत, वडखळ पीआय तानाजी नारनवर, पेण पीआय देवेंद्र पोळ, दादर पीआय अजित गोळे, खोपोली शीतलकुमार राऊत, पीआय खालापूर बाळा कुंभार, पोयनाड पीआय देवेंद्र बेलसर, नागोठणे पीआय संदीप पोमन तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# रायगडातील पर्यटनाच्या स्थगित योजनांना चालना -खासदार तटकरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पर्यटन विकास योजनांवरील कामांना स्थगिती देण्यात आली होती. ही स्थगिती उठविण्यात आली आहे. यामुळे रायगड जिल्ह्यातील पावणे दोनशे कोटी रुपयांची कामे मार्गी लागणार असल्याची माहिती खासदार सुनील तटकरे यांनी दिली. ते अलिबाग येथे पत्रकार परिषदेत बोलत होते.

प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत जिल्ह्यात जवळपास पावणे दोनशे कोटी रुपयांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. यात किहीम येथे सलीम अली पक्षी अभ्यास केंद्र, दिवेआगर येथील कासव संशोधन प्रकल्प, देवकुंड धबधबा परिसर विकास, रोहा येथे शिवसृष्टी प्रकल्पाची उभारणी, पोलादपूर येथे घागरकोंड येथे झुलत्या पुलाचे बांधकाम, सुर्याजी मालुसरे समाधीस्थळ विकास, हरिहरेश्वर येथे सभामंडप आणि सेल्फी पॉईंटची निर्मिती, शिवथरघळ, उंबरखिंड येथील विकास, अलिबाग कान्होजी आंग्रे समाधीस्थळ परिसर विकास, वरसोली आणि कुरूळ येथील मंदीर विकास रोहा हनुमान मंदिर परिसर विकास, श्रीवर्धन येथील धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे नुतनीकरण, पेण गागोदे येथील विकास कामांचा यात समावेश असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी सांगितले.

बहुप्रतिक्षीत सागरी महामार्गाचे काम एमएसआरडीसीच्या माध्यमातून केले जाणार आहे. यासाठी निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. अलिबाग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे कामही लवकरच मार्गी लागेल, अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

## CHANGE OF NAME

I the undersigned **Radha Harjeevan Thakur** (Old name) residing at **M.Dhutum, Post- Jasai, Tal- Uran, Dist- Raigad** I Changed my name by the Affidavit No. **2352041721268600177015 dated 14/09/2023.** So that I remitter issue may here after be called by new name **Vidya Vikas Kadu**

Sign. by New Name
**Vidya Vikas Kadu**

# खालापुरात शिक्षकांना ई-शाळा अंतर्गत प्रशिक्षण; डिजिटल साक्षरतेला चालना

**खोपोली : प्रतिनिधी**

कोरोना काळात पर्याय म्हणून सुरू झालेल्या ऑनलाईन शिक्षण पद्धतीत रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांनी आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. माझी ई-शाळा कार्यक्रमांतर्गत शिक्षकांचे प्रशिक्षण पंचायत समिती खालापूर या ठिकाणी घेण्यात आले.

खेडोपाडी आणि दुर्गम भागातील शाळांमध्येदेखील डिजिटल साक्षरतेसाठी साधन उपलब्ध होत आहेत. माझी ई-शाळा कार्यक्रमा अंतर्गत समग्र शिक्षा अभियान, महाराष्ट्र शासन आणि प्रथम इंन्फोटेक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने खालापूर तालुक्यातील ८९ शाळांमधील ११२ शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये डिजिटल साक्षरतेला चालना देणे, डिजिटल साधने आणि त्यांचा वापर यामधील दरी कमी करणे, शिक्षणामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे, विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा स्तर उंचावणे यासाठी प्रशिक्षण देण्यात आले.



या प्रशिक्षणामध्ये हायब्रीड अध्ययन पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगतीचा स्तर कसा वाढवता येईल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण कार्यक्रमाला गटशिक्षण अधिकारी कैलास चोरामले, सर्व केंद्रप्रमुख शिक्षक उपस्थित होते. माझी ई- शाळा या कार्यक्रमाचे प्रथम इन्फोटेक फाऊंडेशनचे जिल्हा समन्वयक राकेश डिंगणकर, प्रशिक्षक नंदिनी देवकर आणि मनीषा ठाकूर उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून एखादी कविता, विषय अधिक परिणामकारक शिकविता येतो. समग्र माहिती ज्ञानाचा खजिना उपलब्ध होत असून पुस्तकाबाहेरील जगाची माहिती होते.**
**-कैलास चोरामळे, गटशिक्षण अधिकारी, खालापूर**


## पनवेल महानगरपालिका
### जाहीर सूचना

उप आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन विभाग), पनवेल महानगरपालिका हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रभावीपणे करणेकामी ट्रान्सफर स्टेशन बांधणे या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता खाली नमूद केलेल्या बाबींकरीता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर कामाचा तांत्रिक तपशील व इतर बाबी www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि.१५/०९/२०२३ ते दि.२२/०९/२०२३ पर्यंत दुपारी ०३.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदर कामाची बाजारभाव दरपत्रके दि.१५/०९/२०२३ ते दि.२२/०९/२०२३ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत घनकचरा व्यवस्थापन विभागात स्वीकारण्यात येतील.

जा.क्र पमपा/घकवि/२५२३/
प्र.क्र.२८८/८४५/२०२३
दि. १५/०९/२०२३

**सही/-**
**उप आयुक्त पनवेल**
महानगरपालिका



## Declaration

I Ravindra Laxman Kulkarni , Ex-POCD1 , No 163469-Y from Indian Navy hereby state that Date of Birth of my mother Mrs Urmila Laxman Kulkarni is not properly mentioned on my Service records and on her Adhaar card too. Only her Birth year 1936 is mentioned on Adhaar card. As per best of her and our knowledge her Date of Birth is 19/01/1936. Affidavit about the same has been made before Executive Magistrate, Uran on 13/09/2023.

**Date: 16/09/2023**

**Sd/-**
**Ravindra Laxman Kulkarni**


# मुरूड तालुक्यात आयुष्यमान भव मोहिमेचा शुभारंभ



**मुरूड : प्रतिनिधी**

आयुष्यमान भव मोहिमेचा शुभारंभ डॉ. मकबुल कोकाटे यांच्या हस्ते लेडी कुलसूम बेगम ग्रामीण रुग्णालय येथे करण्यात आला.

या वेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सौरभ घरड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. उषा चौले, डॉ. बालाजी पुरी, डॉ. ऋषिकेश भारती, संजीवनी आरोग्य केंद्राचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे, रोहन निगुडकर, संजय शेडगे, संजय वानखेडे, राकेश पाटील, दक्षता चोगले आदी उपस्थित होते.

आयुष्यमान भव मोहिमेदरम्यान आयुष्यमान आपल्या दारी, आयुष्यमान मेळावा, आयुष्यमान सभा, रक्तदान शिबिर, स्वच्छता मोहीम व ० ते १८ वर्षे वयोगटातील मुलांची अंगणवाडी आणि शाळांमध्ये आरोग्य तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती दक्षता चोगले यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र चुनेकर यांनी केले, तर आभार विठ्ठल शिंदे यांनी मानले.

# गणित प्रज्ञा परीक्षेत श्रेयस साने रायगडात प्रथम

**पेण : प्रतिनिधी**

येथील कारमेल हायस्कूलचा विद्यार्थी श्रेयस साने याने गणित प्रज्ञा परीक्षेत राज्य शिष्यवृत्ती गटात राज्यात ३६वा तर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकवल्याने रायगड गणित मंडळाचे वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभास रायगड गणित मंडळाचे अध्यक्ष डी. जी. मोरे (खोपोली), कार्यवाहक संजय शिर्के (पनवेल) आदी उपस्थित होते.

रायगड गणित अध्यापक मंडळ वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ पेण प्रायव्हेट हायस्कुल येथे रविवारी झाला. या वेळी गणित संबोध प्रविष्ट ८५० विद्यार्थी पदक व सर्टिफिकेट प्राप्त २५९ विद्यार्थी, गणित प्राविण्य परिक्षेस प्रविष्ट ५०० विद्यार्थी तसेच सर्टिफिकेटप्राप्त ८३ विद्यार्थी व प्रज्ञा परीक्षा प्रविष्ट ८३ विद्यार्थी यामध्ये सिल्व्हर कॅटॅगरी सर्टिफिकेट प्राप्त १४ व राज्य शिष्यवृत्ती धारक (गोल्डन कॅटॅगिरी) जिल्ह्यात एकमेव आलेल्या श्रेयस रंगनाथ साने (कारमेल हायस्कूल,पेण) यांचा सत्कार करण्यात आला. विशेष बाब म्हणजे



हाच विद्यार्थी इ. पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षा २०२३मध्ये रायगड जिल्ह्यात प्रथम आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे व मार्गदर्शक शिंगरूत यांनी रायगड जिल्ह्याला तब्बल १४ वर्षांनी राज्य शिष्टवृत्ती गटातून हा बहुमान (इ. ५ वी गटात) श्रेयस रंगनाथ साने याने प्राप्त करून दिला असे सांगितले. आपल्या मनोगतात श्रेयस साने याने, आपली आई अर्चना साने तसेच वडील त्याचप्रमाणे मार्गदर्शक शिंगरूत, पांडुरंग पडळकर व आपले मामा दिलीप कुमार व हृदय शहा यांना तसेच आपल्या कारमेल शाळेतील मित्रांनाही आपल्या यशाचे श्रेय दिले. संतोष जाधव, के. आर.पाटील, पी.पी. सोरटे, मंडळ समिती सदस्य कुंभार सर, उदय म्हात्रे, झिटे मॅडम व शर्वरी जोशी उपस्थित होते.


## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./३८/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

१) श्री. रामदास भिकाजी जाधव
डी/१०२, जूही अपार्टमेंट, प्लॉट नं. ६३, सेक्टर ६ ए, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०९.
२) श्री. गोविंद देवराम कदम
रुम नं. सी/२०१, जूही अपार्टमेंट, प्लॉट नं. ६३, सेक्टर ६ ए, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०९.
३) श्री. श्रीमंत केशव खांडेकर
हिरा सिद्धी सोसायटी, बिल्डिंग नं. डी, रुम नं.४०२, ४ था मजला, ओल्ड पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. — **प्रतिवादी**

**दावा रूपये १७,५६,७०४/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ११/१०/२०२३ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १५/०९/२०२३ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**



## जाहीर पेपर नोटीस (प्रतिवादी क्र. ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**
**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./३६/२०२३**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. — **वादी**

**विरूद्ध**

१) श्री. राजारात श्रीपत गोळे/कुंदा राजाराम गोळे
सत्यम को.ऑप.हौ.सोसायटी, रुम नं.१०६, प्लॉट नं.१११, सेक्टर २ ई, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१८
२) श्री. सुरेश पांडुरंग ढालपे
ए/३०/१, सिडको कॉलनी, नवीन पनवेल, सेक्टर १३, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६.
३) श्री. संतोष नाना पवार
एच.आय.जी.-१, रुम नं. ३२, सेक्टर १, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२१८
४) श्री. संजय श्रीपत गोळे
घर नं. १४८४, लाईन आळी, शिवाजी रोड, ओल्ड पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६. — **प्रतिवादी**

**दावा रूपये १९,३९,५४३/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ११/१०/२०२३ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १५/०९/२०२३ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.
कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**


# माझी माती, माझा देश संकल्प अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नेरळ : बातमीदार**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ९ ऑगस्ट रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगतानिमित्त माझी माती, माझा देश अभियान राबवण्यात येत आहे. नेरळ भाजपकडून माझी माती, माझा देश संकल्प राबवण्यात आला. यावेळी निवृत्त सैनिक कुमार गोटीराम जाधव व निवृत्ती पाटील उपस्थित होते.

या अभियानात देशाचा स्वाभिमान जपण्यासमवेत नागरिक म्हणून आपली कर्तव्य भावना व जागरूकता वृद्धींगत व्हावी यासाठी पंचप्रण प्रतिज्ञा गावोगावी घेतली जात आहे, तसेच पुढील पिढ्यांसाठी साक्षीदार ठरतील अशी दीर्घकाळ टिकणारी ७५ वृक्षांचे रोपण करून एक वेगळा संदेश गावोगावी दिला जाणार आहे. गावातील माती एका कलशातून एकत्र करून ती राजधानी दिल्ली येथे कर्तव्यपथावर अमृत वाटिकेसाठी पाठविण्यात असल्याचे भाजप महिला मोर्चाच्या दक्षिण रायगड उपाध्यक्ष श्रेया कुंटे यांनी सांगितले, तर उत्तर रायगड जिल्ह्याध्यक्ष अविनाश कोळी यांनी देखील उपस्थिताना मार्गदर्शन केले. दरम्यान या संकल्प अभियानाला येथील आदिवासी महिला बांधवांनी उपस्थिती दर्शवली होती.

हे अभियान राबवण्यासाठी भाजपचे नम्रता कांदळगावकर व श्रद्धा कराळे यांनी पुढाकर घेतला होता. त्यासाठी अश्विनी पाटील, श्रेया कुंटे, सोनाली पडवळे यांसह नेरळ येथील समिधा टिल्लू, मृणाल खेडकर, वैभवी पिंपुटकर, सुशीला लोभी महिला वर्ग व अनेक भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते.




## कर्जत नगरपरिषद, कर्जत जि. रायगड
### जाहीर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या उक्त ८ (३) अन्वये या नोटीशीव्दारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडाचा प्रकार | झाड तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख प्रीत को. ऑप. हौ. सोसा.ली. | जांभूळ-०२, नारळ-०१, सुरू-०१, जंगली-०१ | धोकादायक असल्याने |
| २. | प्रमुख आशिष सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत | बदाम-०१, शेवगा-०१ | धोकादायक असल्याने |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्षा अधिकारी कर्जत नगरपरिषद इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही सुचना हरकती असल्यास ही जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांचे आंत लेखी स्वरुपात या कार्यालयास कळवावे.

जावक क्र.: १७८२/२३-२४
दि. १५/९/२०२३

**सही/-**
**मुख्याधिकारी तथा वृक्षाधिकारी कर्जत**
नगरपरिषद, कर्जत



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की,

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. वावेघर, ता. पनवेल, जि. रायगड**

| अनु. क्र. | गट नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | मालकाचे नाव | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ११/७ | ०-३५-४०<br>पो.ख. ०-०३-३०<br>**एकूण ०-३८-७०** | श्री. अशोक देवजी शहा | ७.५० |

याप्रमाणे वर नमुद मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी वर नमुद मिळकतीबाबत झालेल्या व्यवहारांस व मिळकतीबाबत होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाही व्यक्तीची/संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दंग, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गव्हाण, दान बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा हक्क, पोटगी, लिज, सबलिज, लिएन, सदर मिळकतीतुन जाण्या येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीविक्री करार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक :- १२/०९/२०२३

**सही/-**
**ॲड. ज्ञानेश्वर श्रीनिवास कुळकर्णी**
B.A.,LL.B.

ऑफिस : २१, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल-४१०२०६. जि. रायगड.



## PUBLIC NOTICE

TAKE NOTICE THAT, my client 'Mr. Purushottamlal B. Suthar and Mrs. Raju Devi W/o Purushottamlal Suthar, having address at Unit No.9, Shwet Ganga CHSL, Plot No. G-85, Sector 12, Kharghar, Navi Mumbai-410210', has purchased 'Unit No.9, Shwet Ganga CHSL, Plot No. G-85, Sector 12, Kharghar, Navi Mumbai-410210' ('Unit') from Mrs. Sheetal Sachin Kumbhare and Ors. Vide agreement dated 07/11/2017 and 06/01/2018.

In respect of the aforesaid unit my client have lost chain documents as - 1) Original Allotment Letter dated 01/02/2006 issued by CIDCO Ltd in the name of Mr. Budhaji Dagadu Nangare and 2) Original Registration Receipt bearing No. 753 dated 02/02/2006 in respect of document registered at SRO Panvel – 3 at Sr. No. 749/2006. I have not found the aforesaid documents even after diligent search. The said documents are missing from the above said unit.

In the aforesaid context it is notified that, anybody found or in custody of the said documents, then please inform & return it to the undersigned and if any person having or claiming any right, title or interest in respect of the said unit and the aforesaid documents shall also make the same known in writing to the undersigned at the address given herein below within 7 days from the date of publication hereof, failing which any claim shall be deemed to be waived and/ or abandoned, given up or non existing.

Date : 15/09/2023
Place : Navi Mumbai

**Sd/-**
Adv. Navin V. Dhongadi
Adv. Anand T. Bhautik

Office No. 48, Plot No.34, Krishna Apartment, Sector-36, Kamothe, Navi Mumbai 410209
Mob. No. 9004087873

## निवडक

### शिरवणेत खोदलेल्या रस्त्याची डागडुजी



**नवी मुंबई** : शिरवणे गाव प्रभाग ८९मध्ये खोदलेल्या रस्त्याची डागडुजी करण्यास सुरुवात झाली आहे. प्रभाग ८९ शिरवणे येथे पाण्याची पाईपलाईन टाकण्यासाठी खोदकाम करण्यात आले. मुख्य व जोडरस्ते खोदून ठेवण्यात नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत होता. माजी नगरसेविका सुतार यांनी आमदार गणेश नाईक यांच्याकडे हा प्रश्न मांडला होता. याची दखल घेत शिरवणे प्रभाग ८९मध्ये पालिकेकडून खोदलेल्या रस्त्यांची डागडुजी करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

### कसळखंड गावात लाईट पोल



**मोहोपाडा** : कसळखंड ग्रामपंचायतीच्या सरपंच माधुरी अनिल पाटील यांच्या पाठपुराव्याने आमदार महेश बालदी यांच्या आमदार निधी फंडातून कसळखंड ग्रामपंचायत परिसरात विविध विकास कामे मार्गी लागली आहेत. कसळखंड स्मशानभूमी, फणसवाडी तसेच शेतकरी कमळाकर घरत या परिसरात अंधाराचे साम्राज्य असल्याने ग्रामस्थांची अडचण होत होती. सरपंच माधुरी अनिल पाटील यांनी ही बाब लक्षात घेऊन येणाऱ्या गणेशोत्सवाच्या अगोदर परिसर प्रकाशाने उजळला पाहिजे, यासाठी शिवाजीनगर स्मशानभूमी लाईट पोल बसवण्यात आले. यासाठी सरपंच माधुरी अनिल पाटील यांचे आभार मानण्यात आले.

### प्राचार्य पालवे यांचा सत्कार

**पनवेल** : माध्यमिक विद्यालयात क्रांतीज्योती राज्य आदर्श पुरस्कार प्राप्त आपल्या सुधागड संकुल कळंबोलीचे प्राचार्य श्री. पालवे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक रमेश साळुंखे उपस्थित होते. त्याचबरोबर या वेळी खवली गावचे सरपंच सुधीर केदारी व खवली गावचे माजी सरपंच व सुधागड तालुका शिवसेनाप्रमुख दिनेश चिले उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक बागुल यांनी सत्कारमूर्ती व बाकीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे ज्येष्ठ शिक्षक डुबे यांनी केले.



# नवी मुंबईत लोकअदालतीमध्ये ५.५५ कोटींची वसुली

## महापालिकेच्या महसुलात वाढ



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई येथील अतिरिक्त जिल्हा न्यायालयामध्ये लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नवी मुंबई महापालिकेमार्फत थकीत मालमत्ता कर देयके, थकीतउपकर व स्थानिक संस्था कर देयके तसेच थकीतपाणी देयके वसूल करण्यासाठी थकबाकीदारांच्या तीन याद्या महानगरपालिकेमार्फत अतिरिक्त जिल्हा न्यायालयाला सादर करण्यात आलेल्या होत्या. त्यास अनुसरुन न्यायालयामार्फत सर्व थकबाकीदारांना लोकअदालतीला उपस्थित राहून थकीत रक्कम भरणा करण्याबाबत नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. या अनुषंगाने नागरिकांनी लगेचच थकीत देयक रक्कम भरणा केली. यामुळे मालमत्ता कर, उपकर व स्थानिक संस्था कर थकबाकीची ५.५५ कोटींची वसुली करण्यात आली.

मालमत्ताकराच्या ८३४ थकबाकीदारांना नोटीस बजावण्यास आली होती. त्यांची थकीत रक्कम ११.१२ कोटी इतकी होती. त्यापैकी ९५ थकबाकीदारांनी महालोकअदालतीमध्ये १.१६ कोटी रक्कमेचा भरणा केला. अशाचप्रकारे उपकर व स्थानिक संस्था कराच्या ४६३थकबाकीदारांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्यापैकी २९ थकबाकीदारांनी ४.३९ कोटी रक्कमेचा भरणा केला. त्याचप्रमाणे महापालिका आयुक्त यांच्या मंजूरीने पाणी देयकाच्या दंडात्मक रक्कमेमध्ये २५ टक्के इतकी सवलत थकबाकीदारांना देण्यात आली होती. त्यानुसार थकीत देयक रक्कम अधिक व्याज अधिक ७५ टक्के दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. पाणी देयकाची थकीत रक्कम वसूल करण्यासाठी २२८८ नोटिसा न्यायालयामार्फत काढण्यात आल्या व त्यापैकी २०५३ नोटिसा प्रत्यक्ष बजावण्यात आल्या होत्या. त्यापैकी एक लाख ३३ हजार इतकी पाणी देयकाची रक्कम लोकअदालतीच्या दिवशी वसूल झालेली आहे.

लोकअदालतीत न्यायालयात दावा दाखल करण्यापूर्वीची प्रकरणे व प्रलंबित दाव्यामध्ये तडजोडीमध्ये ठेवावयाची प्रकरणे यांचे कामकाज चालविले जाते. अतिरिक्त जिल्हा न्यायालयाने बजावलेल्या नोटीशीच्या अनुषंगानेथकबाकीदार आपला थकीत मालमत्ता कर, थकीत उपकर व स्थानिक स्वराज्य संस्था कर तसेच थकीत पाणी देयके यांच्या थकीत रक्कमा भरण्यासाठी पुढे येत आहेत.

यामध्ये महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, करविभागाच्या विभागप्रमुख अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले आणि शहर अभियंता संजय देसाई यांनी महत्वाची भूमिका बजावलेली आहे. या थकीत रक्कमेचा भरणा करण्यात आल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेच्या महसुलात वाढ झालेली असून नागरी सुविधा पूर्ततेसाठी या निधीचा वापर होणार आहे.

## ‘जेएनपीए देशाच्या विकासात मोठे योगदान देणारे बंदर’

**उरण : रामप्रहर वृत्त**

जवाहरलाल नेहरू प्राधिकरण हे देशातील सर्वांत जास्त कंटेनर वाहतूकीचे बंदर आहे. राज्याच्या विकासात व देशाच्या जीडीपीमध्ये महत्त्वपुर्ण योगदान देत आहेत. या बंदराची क्षमता व भविष्यातील नियोजनाचा विचार करता टर्मिनल १ व २चे काम पूर्ण झाल्यास १०० लाख कंटेनरचे प्रतिवर्षी दळण-वळण करता येईल. त्यामुळे देशांच्या विकासात मोठे योगदान देणारे जेएनपीए बंदर असेल, असे मत क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विकासमंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

मंत्री बनसोडे यांनी बुधवारी (दि. १३) उरण येथील जेएनपीएला भेट देऊन जेएनपीए व वाढवण बंदराच्या अनुषंगाने सविस्तर आढावा बैठक घेतली. या बैठकीस जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ, बंदरे विकास विभागाचे सहसचिव सिद्धार्थ खरात, जनरल मॅनेजर मनिषा जाधव, मुख्य जनरल व्यवस्थापक जी. वैद्यनाथन, मुख्य जनरल व्यवस्थापक थॉमस, मुख्य जनरल व्यवस्थापक नितीन बोरगावकर, कॅप्टन बाळासाहेब पवार आणि प्राधिकरणाचे पदाधिकारी उपस्थित होते.

जवाहरलाल नेहरू बंदराची क्षमता व भविष्यातील नियोजन पाहता राज्यातील कृषी, औद्यागीकरणाच्या विकासाला चालना देणारे ठरणार आहे. विशेषत: जेएनपीए- जालना- वर्धा या ट्रान्सपोर्टमुळे शेतकरी व व्यावसायीकांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे, तसेच जेएनपीए हे बंदर लोहमार्ग, महामार्ग आणि विमातळ यांना जोडले गेल्यामुळे मोठी कनेक्टीव्हीटी निर्माण झाली आहे, असेही मंत्री बनसोडे यांनी सांगितले.



## स्वच्छतेची शपथ घेण्याकरिता आज वंडर्स पार्कमध्ये एन्ट्री फ्री




**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छता ही सेवा अभियानाची कचरामुक्त भारत ही संकल्पना आहे. या अनुषंगाने कचरामुक्त शहरांच्या उभारणीत प्रामुख्याने युवकांचा सहभाग ही संकल्पना नजरेसमोर ठेवून गतवर्षीप्रमाणेच याही वर्षी इंडियन स्वच्छता लीग २.० आयोजित करण्यात आलेली आहे.

यादृष्टीने १२ सप्टेंबरपासून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून शनिवारी (दि. १६) वंडर्स पार्क येथे अभिनव स्वरूपात स्वच्छतेची डिजिटल शपथ हा आगळावेगळा उपक्रम राबविला जात आहे. त्याकरिता नवी मुंबईचे विशेष आकर्षणकेंद्र असणाऱ्या सेक्टर १९ ए नेरूळ येथील वंडर्स पार्कमध्ये एक दिवसाकरिता विनामूल्य प्रवेश जाहीर करण्यात आलेला आहे.

सकाळी ७ ते रात्री १० या वंडर्स पार्कच्या वेळेत नागरिकांना वंडर्स पार्क येथे विनामूल्य प्रवेश दिला जाणार असून वंडर्स पार्कच्या मुख्य प्रवेशद्वारावर डिजिटल शपथ घेण्यासाठी उपकरणे ठेवली जाणार आहेत. यादिवशी साधारणत: २५ हजारहून अधिक नागरिक ये-जा करून डिजिटल शपथ घेतील, असे अपेक्षित असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे.

विद्यार्थी, युवक, महिला बचतगट व महिला मंडळे, स्वयंसेवी संस्था, मंडळे, लोकप्रतिनिधी, आबालवृद्ध नागरिक अशा सर्व नागरिकांनी स्वच्छता ही नवी मुंबई शहराची ओळख अधोरेखित करण्यासाठी शनिवारी सकाळी ७ ते रात्री १० या वेळेत आपल्या सोयीच्या वेळी वंडर्स पार्कला कुटुंबिय व मित्रपरिवारासह आवर्जून भेट द्यावी आणि स्वच्छतेच्या डिजीटल शपथ मोहीमेत सहभाग घ्यावा तसेच वंडर्स पार्कच्या नैसर्गिक सौंदर्याचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या वतीने करण्यात येत आहे.





**पनवेल** : भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीसपदी नियुक्ती झाल्याबद्दल विद्या तामखडे यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन आभार व्यक्त केले. या वेळी कामोठे युवा मोर्चाध्यक्ष हर्षवर्धन पाटील, मनोहर शिंगाडे, विष्णू शेलार, कामोठे शहर मंडल अध्यक्ष वनिता पाटील, नीता मंजुळे, हरजिंदर कौर, रश्मी भारद्वाज, मनीषा वणवे, तृप्ती चौरे, लता गोडगे, वैशाली देवडे, सुरवंता खताळ, संगीता तामखडे, मनीषा बेरगळ, दिपाली बंडगर, सुवर्णा मगदूम, वैशाली साबळे, सारिका तामखडे, विद्या शेलार, सीमा साबळे, जयश्री पाटील, स्वाती धडस, शितल गोरड, विमला राजभल आदी उपस्थित होते.

### रेल्वेच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल** : खारघर ते बेलापूर रेल्वेस्टेशनदरम्यान एका अज्ञात व्यक्तीचा रेल्वेची धडक लागून मृत्यू झाला आहे.

मृत व्यक्तीचे अंदाजे वय ६०, उंची चार फूट सहा इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, दाढी माध्यम काळी पांढरी असून अंगात डार्क ब्लू रंगाचा हाफ बाह्यांचा टीशर्ट त्यावर पोटावर आडव्या गुलाबी रंगाच्या बारीक लाईन्स, तसेच पांढ्या निळ्या बारीक आडव्या उभ्या रेषा असलेली चौकडी हाफ पॅन्ट परिधान केली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल रेल्वे पोलीस ठाणे (०२२-२७४६७१२२) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### वाढदिवस अभीष्टचिंतन!



**नवेल : ज्येष्ठ नागरिक दशरथ हुद्दार यांना ८०व्या वाढदिवसानिमित्त माजी नगरसेविका दर्शना भगवान भोईर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी उद्योगपती यशवंत हुद्दार, इंदुमती हुद्दार, मेघा हुद्दार आदी उपस्थित होते.**

# माजी सभापती मनोहर म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम










**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिकेचे माजी स्थायी समिती सभापती मनोहर म्हात्रे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महापालिका प्रभाग क्रमांक १४मधील आदिल टॉवर (बंदर रोड) ते मुसलमान नाका, मिरची गल्ली नाका ते शनी मंदिर, पंचरत्न सर्कलपर्यंत काँक्रीटच्या रस्त्याचे कामाचे भूमिपूजन मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संजय पाटील, उत्तर रायगड उपजिल्हाध्यक्ष जयंत पगडे, उद्योजक इकबाल काजी, असिफ करेल, माजी नगरसेवक मुकित काझी, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, इम्तियाज बेग, एजाज अंबिलकर, शावेज दुस्ते, निसार भाई, जवाद काजी, इमरान काझी, खलील सुरमे, इरफान पटेल, जुबेर पटेल, कैस पटेल, नवीद पटेल, निसार सय्यद, रमिज शेख, रूपेश अंबोळकर, सुनील पाटील, सचिन माळी, हनीफ पटेल, सचिन गमरे, गणेश म्हात्रे, रुपेश घाग, सोनवणे, मोकल साहेब, शेळके, विजय डिसूजा, हिलाल लाला, सर्वेश पाटील, आपटे, घरत, गोसावी, प्रकाश पाटील, विशाल सावंत, मयूर तांबडे, राकेश म्हात्रे, अभिषेक भोपी, महेश भगत आदी उपस्थित होते.



यासोबतच साईनगर येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी बेंचेसचे वाटप, साईनगर रोड येथे वृक्षारोपण, श्री गणेश विद्यामंदिर प.मा.पा. प्राथमिक शाळा क्रमांक ०६, धाकटा खांदा या शाळेला साऊंड सिस्टिम देण्यात आली असून सिमरन मोटर्स मागील आदिवासी वाडी (वहळाची वाडी) येथील बांधवांना २२ नवीन लाईट मीटर कनेक्शन घेऊन देण्यात आले.

# जीवनावश्यक वस्तू वेळेत उपलब्ध करून द्या

## रास्त भाव दुकानदार संघटनेची पुरवठा अधिकाऱ्यांकडे मागणी

**मुरूड : प्रतिनिधी**

कोकणवासीयांसाठी अत्यंत महत्त्वाचा असा गणेशोत्सव जवळ आला आहे, मात्र जिल्ह्यातील सर्व रास्त भाव दुकानदारांना जीवनावश्यक वस्तू उशिरा मिळू लागल्याने शिधापत्रिकधारक नाराजी व्यक्त करीत आहेत. ही यंत्रणा तातडीने सुधारण्यात यावी, अशी मागणी रायगड जिल्हा रास्त भाव दुकानदार कल्याणकारी संघटनेचे अध्यक्ष प्रमोद घोसाळकर व कार्याध्यक्ष चंद्रशेखर देशमुख यांनी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



सप्टेंबरपासून कॅरी फॉरवर्ड सुविधा बंद केली आहे. त्याचप्रमाणे रायगड जिल्ह्यात टप्पा क्रमांक दोनच्या वाहतूकदारांनी पुकारलेल्या संपामुळे याआधीच टप्पा क्रमांक दोनद्वारे रास्त भाव दुकानांपर्यंत होणारी धान्याची वाहतूक १० दिवस उशिराने सुरू झाली आहे.

अशातच जिल्ह्यातील रास्त भाव दुकानदारांना ई-पॉझ मशीनवर ऑनलाईन वितरणासाठी आवश्यक धान्यसाठा अजूनही उपलब्ध झालेला नाही. सध्यस्थितीत रायगड जिल्ह्यात सर्वसाधारण तांदळाऐवजी फोर्टिफाइड तांदळाचे वितरण करण्यात येत आहे, पण याकरिता आवश्यक ऑनलाइन धान्यसाठा एससीएम प्रणालीवर वेळेत उपलब्ध होत नाही. नियुक्त जिल्हा वाहतूक प्रतिनिधींकडून जिल्ह्यातील सर्वच गोदामामध्ये पाठवण्यात येणाऱ्या धान्याचा वाहतूक परवाना वेळच्या वेळी एससीएम प्रणालीवर ऑनलाईन केला जात नाहीत. यामुळे तालुकास्तरावर बल्क डिलिव्हरी करता येत नाही. परिणामी जिल्ह्यातील सर्वच २१ धान्य गोदामातून रास्त भाव दुकानांना ऑनलाइन धान्यसाठा डिस्पॅच ऑर्डर वेळेत उपलब्ध होत नाहीत. यासह कालबाह्य झालेल्या ई-पॉझ मशीन व सातत्याने येणारा सर्व्हर प्रॉब्लेम या आणि अशा इतर अनेक तांत्रिक कारणांमुळे संपूर्ण जिल्ह्याचे धान्य वितरण प्रलंबित राहते. यावर त्वरित उपाययोजना जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी करून असंख्य शिधा दुकानदारांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

आज रोजी रायगड, जिल्ह्यामध्ये केवळ पनवेल तालुक्यात आनंदाच्या शिधाचे वितरण सुरू झाले आहे. इतर तालुक्यांमध्ये अजूनही सर्व प्रकारच्या शिधा वस्तू उपलब्ध झालेल्या नाहीत. ज्या ठिकाणी चारही शिधावस्तू उपलब्ध झालेल्या आहेत त्या दुकानांमध्ये केवळ पिशव्या ऑनलाईन झाल्या नाहीत. या एका कारणाने शिधाचे ऑनलाईन वितरण करता येत नाही. परिणामी रायगड जिल्ह्यामधील रास्त भाव धान्य दुकानदार सप्टेंबरमधील धान्याचे तसेच आनंदाचा शिधाचे वितरण वेळेत पूर्ण होत नसल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

# रेवदंडा चौपाटीवर घाणीचे साम्राज्य

## ▪ शौचालय तुटलेले, परिसराचे बनलेय डम्पिंग ग्राउंड



(छाया : महेंद्र खैरे)

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा चौपाटीवर पर्यटकांच्या सुविधेसाठी सागर सुरक्षा अंतर्गत उपलब्ध करण्यात आलेल्या रेडीमेड शौचालयाची तोडफोड करून पूर्णपणे निकामी करण्यात आले आहे, तर समुद्र चौपाटीवर शौचालय परिसराचे डम्पिंग ग्राउंड झाले असून कचराकुंडीने घाणीचे साम्राज्य निर्माण केले आहे.

रेवदंडा पारनाका येथून समुद्र चौपाटीकडे नित्याने पर्यटक, पै-पाहूणे, स्थानिकांची रेलचेल असते. त्यामुळे या गर्दी असलेल्या ठिकाणी रेडीमेडे शौचालय व चेंजिग रूमची उभारणी करण्यात आली होती. हे शौचालय प्लास्टिक-फायबर बनावटीचे होते, मात्र स्थानिकाकडून या शौचालयाचा वापर होत नव्हता. पर्यटकांच्या सुविधेसाठी ठेवण्यात आलेले या रेडीमेड शौचालयाची नासधूस व तोडफोड करण्यात आली असून ते पूर्णपणे निकामी करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या परिसराला डम्पिंग ग्राउंडचे स्वरूप प्राप्त झाले आहे. तेथे स्थानिकांनी कचराकुंडी तयार केली आहे. अशा प्रकारात चौपाटीवर घाणीचे साम्राज्य निर्माण केले आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरली असून आरोग्यास धोका निर्माण झाला आहे.

रेवदंडा समुद्र चौपाटीवर नित्याने पर्यटक, पै-पाहूणे तसेच स्थानिक ये-जा करतात. त्यामुळे येथील शौचालयाची नासधूस, तोडफोड व परिसरातील दुर्गंधी नजरेत येते. येथील शौचालयाची दुरवस्था व कचराकुंडीने निर्माण केलेले घाणीचे साम्राज्य गेले अनेक महिन्यांचे चित्र आहे, मात्र रेवदंडा ग्रामपंचायतीचे पूर्णपणे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते.

याबाबत सामाजिक कार्यकर्ते तेजस शिंदे यांनी रेवदंडा ग्रामपंचायतीस समुद्र चौपाटीवरील कचराकुंडीबाबत लक्ष्य वेधून घेण्याकरिता निवेदन दिले आहे. गणेशोत्सवात विसर्जनाच्या वेळी मोठी गर्दी रेवदंडा समुद्र चौपाटीवर होत असते तसेच कचराकुंडीची दुर्गंधी स्थानिकांच्या आरोग्यास अहितकारक असल्याने त्वरित येथील कचराकुंडी हटविण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

याबाबत रेवदंडा ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी दिवकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी शौचालयाची दुरूस्ती लवकरच करण्यात येईल, तर गणेशोत्सवापूर्वी येथे साफसफाई करण्यात येईल, असे सांगितले.

# मोरे महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी शिबिर

**रोहा : प्रतिनिधी**

रोह्यातील धाटाव येथील एम. बी. मोरे महिला महाविद्यालयात महिला विकास कक्ष आणि लायन्स क्लब ऑफ रोहा यांनी संयुक्तिकरित्या किशोरवयीन मुलींसाठी वैद्यकीय तज्ञाकडून मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते.

लायन्स क्लबच्या अध्यक्ष सुश्मिता शितोळकर आणि त्यांच्या सहकारी यांच्या उपस्थितीत डॉ. तुषार राजपूत यांनी 'महिलांचे आरोग्य' या विषयावर व्याख्यान दिले. त्याचबरोबर विद्यार्थिनींच्या तसेच उपस्थित महिला प्राध्यापिकांच्या शंकांचे निरसन केले.

व्याख्यानानंतर लायन्स क्लबकडून महिला महाविद्यालयास सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशीनदेखील देण्यात आली. या सहकार्याबाबत मोरे महिला महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षातर्फे लायन्स क्लबचे आभार मानण्यात आले.

उपक्रमास मोरे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, महिला विकास कक्षाच्या प्रमुख प्रा. दिपाली वारंगे, प्रा. मयुरी लहाने, प्रा. प्रतिमा भोईर, प्रा. योगिता नेहेते आणि ७३ विद्यार्थिनी तसेच लायन्स क्लबकडून अनघा वाणे, तेजल शहा, रशिदा रोहावाला, किशोर तावडे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. मयुरी लहाने यांनी केले.

# आयुष्मान भव मोहिमेचा जनतेने लाभ घ्यावा

## ▪ आमदार महेंद्र थोरवे यांचे आवाहन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सर्वसामान्यांपासून आर्थिकदृष्ट्या सधन असलेल्या प्रत्येकाने शासनाच्या आयुष्मान भव या मोहिमेचे फायदे उचलावेत आणि ही मोहीम यशस्वी करावी, असे आवाहन कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केले आहे. कर्जत तालुक्यात या मोहिमेचा शुभारंभ कर्जत उपजिल्हा रुग्णालयात आरोग्य खात्यामार्फत करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.



(छाया : विजय मांडे)

राज्य शासनाचे कर्जत उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा परिषदेचा आरोग्य विभाग यांच्या माध्यमातून ही मोहीम कर्जतमध्ये राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास कर्जत उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. विजय म्हसकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शामसिंग पावरा, वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज बनसोडे, डॉ. सी. के. मोरे आदी उपस्थित होते. सुरुवातीला आरोग्य विभागाच्या या महत्त्वाकांक्षी मोहिमेची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. म्हसकर यांनी दिली, तर ही मोहीम कर्जत तालुक्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात आणि ग्रामीण रुग्णालयात सुरू करण्यात आली असल्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पावरा यांनी स्पष्ट केले.

महायुती सरकारकडून गोरगरीब जनतेला उच्छभू जनतेपर्यंत सर्वांना उपयोगी पडेल आणि सर्वांच्या आरोग्याची काळजी घेईल. अशी आयुष्मान भव योजना आणली आहे. ही योजना आपल्या सर्वांच्या आरोग्याची काळजी घेणारी असल्याने सर्वांनी या मोहिमेत सहभाग घेऊन आपली नोंदणी करावी, असे आवाहन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले.

# विशेष संक्षिप्त पुनरीक्षण मोहिमेंतर्गत करता येणार आगाऊ मतदार नोंदणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

आतापर्यंत मतदार नोंदणीसाठी १ जानेवारी हा अर्हता दिनांक असायचा. म्हणजे १ जानेवारी किंवा त्याआधी १८ वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकांना मतदार नोंदणी करता येत होती, पण आता १ जानेवारी, १ एप्रिल,१ जुलै, आणि १ ऑक्टोबर या तारखेला किंवा त्याआधी ज्या नागरिकांची अठरा वर्षे पूर्ण होतील त्यांना १७ ऑक्टोबर २०२३ ते ३० नोव्हेंबर २०२३ या विशेष मोहिमेंतर्गत आगाऊ मतदार नोंदणी करता येणार आहे.


निवडणुका न्याय्य व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी मतदारयाद्यांचे शुद्धीकरण व अद्यावतीकरण अत्यंत महत्त्वपूर्ण असते. १७ ऑक्टोबर रोजी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि मतदार नोंदणी कार्यालयांमध्ये प्रारूप मतदार यादी प्रकाशित केली जाईल तसेच या कालावधीत दावे व हरकतीदेखील स्वीकारण्यात येणार असून २६ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत व ५ जानेवारी २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

मतदारांनी आपले नाव, पत्ता, जन्मदिनांक, वय, मतदान ओळखपत्र क्रमांक, मतदार संघ इत्यादी तपशील मतदारयादीत तपासून ते अचूक आहेत का याची खात्री करणे आवश्यक आहे. बरेचदा ऐन मतदानाच्या दिवशी आपले नाव मतदार यादीत नाही, अशी तक्रार अनेक मतदारांकडून केली जाते. त्यामुळे मतदारांनी १७ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होणाऱ्या प्रारुप मतदारयादीतील आपले तपशील तपासणे महत्त्वाचे आहे. १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर हा कालावधी मतदार नोंदणीचा आहे.

यंदाच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमाच्या निमित्ताने वरील कालावधीतील दोन शनिवार व दोन रविवार या सुटीच्या दिवशी राज्यभर विशेष शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. शिवाय, मतदार नोंदणी, नाव वगळणी, तपशिलातील दुरुस्त्या या सुविधा NVSP, Voter Portal या संकेतस्थळावर आणि Voter Helpline या मोबाईल ॲपवर उपलब्ध आहेत. उपरोक्त कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून कार्यरत असणारा कर्मचारी वृंदासोबत मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी यांनी सहकार्य करावे तसेच दुबार नावे, मृत व्यक्ती, गावातून कायमस्वरूपी स्थलांतरित झालेल्या व्यक्ती, लग्न होऊन अन्य गावात गेलेल्या विवाहित स्त्रियांच्या नावांची मतदारयादीतून वगळणी केली जाईल. या कालावधीत विशेष ग्रामसभा देखील घेण्यात येणार आहेत.

उपरोक्त कालावधीत आतापर्यंत मतदार नोंदणी न केलेल्या पात्र युवांनी मतदारयादीत आपले नाव नोंदवावे, तसेच प्रत्येक जागरूक नागरिकाने १७ ऑक्टोबर रोजी प्रारूप मतदारयादीतील आपले तपशील अचूक आहेत का याची खात्री करून घ्यावी व प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रायगड डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे.

# तासगावकर शैक्षणिक संकुलात नर्सिंग महाविद्यालयाला मुंबई विद्यापीठाची मान्यता



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील चांधई आणि डिकसळ येथे तासगावकर उद्योग समूहाचे शैक्षणिक संकुल आहे. दोन वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या तासगावकर शैक्षणिक संकुलात ५० प्रकारचे कोर्सेस संस्थेमार्फत सुरू आहेत. मुंबई विद्यापीठाने तासगावकर समुहाच्या चांधई येथील संकुलात नर्सिंग महाविद्यालयाला मान्यता दिली असून त्यामुळे येथे आता विद्यार्थ्यांना बीएससी नर्सिंग अभ्यासक्रम करता येणार आहे.

कर्जत तालुक्यातील डॉ. एन. वाय. तासगावकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन चांदई आणि डिकसळमध्ये तब्बल ५०हून अधिक वेगवेगळे अभ्यासक्रम आणि १५पेक्षा अधिक महाविद्यालये यांचा समावेश या शैक्षणिक समुहात आहे. महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त असलेले सौ. वंदना तासगावकर कॉलेज ऑफ नर्सिंग सुरू आहे. विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासन मान्यता असलेली बीएससी नर्सिंग हा पदवी अभ्यासक्रम सुरू झाला आहे. विद्यार्थ्यांसाठी प्रवेश देण्याचे काम सुरू झाले असून पहिल्या वर्षी ६० विद्यार्थ्यांची पहिली बॅच असणार आहे. शैक्षणिक संकुलाच्या चांदई कॅम्पसमध्ये असून येथे विद्यार्थ्यांसाठी निवासी शिक्षण घेण्याची सुविधादेखील उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती तासगावकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशनचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. नंदकुमार तासगावकर यांनी दिली.

कर्जत आणि आसपासच्या गरजू विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमासाठी आता बाहेर जाण्याची आवश्यकता नाही. सोबतच विद्यार्थ्यांना निवासी शिक्षण घेण्याची सुविधादेखील उपलब्ध आहे, तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेतेसाठी पूर्ण कॅम्पसमध्ये सीसीटीव्ही आणि सुरक्षाविषयक सर्व सुविधा उपलब्ध आहेत. दरम्यान, आगामी काळात विद्यार्थ्यांना परदेशी भाषा जसे की इंग्रजी, फ्रेंच, स्पॅनिश, जर्मन व जापनीज अशा भाषा शिकण्याची उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## भाडे तत्वावरील गस्ती नौकेसाठी निविदा

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अंतर्गत समुद्रामध्ये गस्त घालण्यासाठी गस्ती नौका भाडेतत्वावर घेण्याबाबत मुख्य कार्यालयीन स्तरावर ई-निविदा प्रक्रिया सुरू आहे.

गस्तीकामी नौका उपलब्ध करून देण्यास इच्छुक असलेल्या नौका मालकांनी २० सप्टेंबरपूर्वी निविदा दोन लिफाफा (दोन बिड) पद्धतीने आवश्यक त्या कागदपत्रासह या कार्यालयास सादर करावयात, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय संजय पाटील यांनी केले आहे. नौका गस्तीकामी उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित नौकामालक यांच्यामार्फत अटी-शर्तींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

# सारथी शिष्यवृत्ती : असा करा अर्ज

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेद्वारे छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती सन २०२३-२४ शैक्षणिक वर्षातील इयत्ता नववी दहावी व अकरावीच्या मराठा व कुणबी गटातील विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत. सारथी शिष्यवृत्ती काय आहे? कुणासाठी आहे? पात्रता काय आहे? कागदपत्रे कोणती आवश्यक आहेत? अर्ज कसा व कुठे करावा लागेल? या विषयी संपूर्ण माहिती आपण आज या लेखात पाहणार आहोत.

छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीसाठी इयत्ता नववी, दहावी व अकरावीच्या मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेऊन सादर करणेबाबत परिपत्रक व मार्गदर्शक सूचना छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था पुणे यांचे कडून मागविण्यात येतात. ई-सारथी पुणे या संस्थेकडून वरील मराठा कुणबी गटातील इयत्ता नववी ते अकरावीतील पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात प्रतिमहा ८०० रुपये या प्रमाणे वर्षाला एकूण ९६०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. इयत्ता नववी, दहावी व अकरावीमध्ये नियमित शिकत असलेल्या व छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीचा पात्र असणाऱ्या मराठा व कुणबी या लक्षित गटातील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तालुका स्तरावर गट शिक्षण अधिकारी कार्यालयाकडे जमा करायचे आहेत. अर्ज करू इच्छिणाऱ्या इयत्ता नववी, दहावी व अकरावीतील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्रपणे अर्जाचा नमुना असतो.

छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीद्वारे इयत्ता नववी, दहावी, अकरावीतील मराठा व कुणबी समाजातील पात्र विद्यार्थ्यांना प्रतिमहा ८०० रुपये म्हणजेच एका शैक्षणिक वर्षात ९६०० रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. मराठा व कुणबी समाजातील आर्थिक परिस्थिती दुर्बल असणाऱ्या होतकरू किंवा हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी पात्रता खालीलप्रमाणे**

सारथी शिष्यवृत्ती २०२३-२४चा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी हा इयत्ता नववी, दहावी व अकरावी या वर्गात शिक्षण घेत असावा. या शिष्यवृत्तीचा लाभ मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या चार गटातील विद्यार्थी घेऊ शकतात. राज्यातील सर्व शासकीय, शासनमान्य, अनुदानित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत जी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत असे विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीकरिता पात्र आहेत.

एनएमएमएस ही परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व केंद्र शासनाची शिष्यवृत्ती अपात्र असलेल्या व इयत्ता नववीमध्ये शिकत असलेल्या मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या लक्षित गटातील अर्ज केलेल्या पात्र विद्यार्थ्यांना छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती पात्र समजण्यात येईल. इयत्ता दहावीमध्ये नियमित शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी इयत्ता नववीमध्ये ५५% टक्के गुणांसह वार्षिक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इयत्ता अकरावीमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीमध्ये ६०% गुणांसह वार्षिक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

इयत्ता नववीमधील प्रस्तुत शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ३,५०,००० रुपयांपेक्षा कमी असावे. इयत्ता दहावी व अकरावीमधील प्रस्तुत शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न १,५०,००० रुपयांपेक्षा कमी असावे.

**खालील शाळेतील विद्यार्थी छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीसाठी अपात्र आहेत**

विनाअनुदानित शाळेत शिकणारे विद्यार्थी तसेच स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील विद्यार्थी व ज्युनियर कॉलेज मधील विद्यार्थी. केंद्रीय विद्यालयात शिकणारे विद्यार्थी. जवाहर नवोदय विद्यालयात शिकणारे विद्यार्थी. शासकीय वस्तीगृहाच्या सवलतीच्या भोजन व्यवस्थेचा व शैक्षणिक सुविधेचा लाभ घेणारे विद्यार्थी. सैनिक शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी.

**आवश्यक कागदपत्रे**

छत्रपती राजाराम महाराज शिष्यवृत्ती साठी आवेदन करताना विद्यार्थ्यांकडे खालील कागदपत्रे असणे आवश्यक आहेत.

विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरीत विहित नमुन्यात शिष्यवृत्तीस मागणी केलेला अर्ज. इयत्ता ९ वी, १० वी व ११ वी साठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. मुख्याध्यापकांचे किंवा प्राचार्यांचे स्वाक्षरीत विहित नमुन्यातील शिफारस पत्र. विद्यार्थ्यांच्या पालकांचा तहसीलदारांच्या स्वाक्षरीतील चालू वर्षातील उत्पन्नाच्या दाखल्याची सत्यप्रत. विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची सत्यप्रत. विद्यार्थ्यांचे स्वतःचे नावे बँक पासबुकच्या पहिल्या पानाची सत्यप्रत (नाव, खाते क्रमांक, आयएफएससी कोडसह नमूद असणे आवश्यक आहे.)

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता नववीच्या वार्षिक परीक्षेत ५५% गुणासह पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण असलेल्या गुणपत्रिकेची सत्यप्रत. इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीच्या वार्षिक परीक्षेत ६०% गुणासह पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण असलेल्या गुणपत्रिकेची सत्यप्रत. एनएमएमएस परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रक अथवा निकाल पत्रक. अन्य् अनावश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडण्याची आवश्यकता नाही.

शाळा स्तरावर अर्ज भरून कागदपत्रांसह गट शिक्षणाधिकारी कार्यालय येथे जमा करणे व ऑनलाइन लिंकवर माहिती भरता येते.

१. गट शिक्षणाधिकारी यांनी तालुका स्तरावर अर्जाची छानणी व पडताळणी केलेले अर्ज माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना सादर करावे.

२. माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी सर्व अर्ज मा. व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, सारथी पुणे, महाराष्ट्र ४११००४ या पत्त्यावर सादर करावे.

**-विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई**

# आशिया चषकातून पाकिस्तान ‘आऊट’

## उद्या भारत आणि श्रीलंका यांच्यात रंगणार फायनल

**कोलंबो : वृत्तसंस्था**

आशिया कपच्या सुपर ४ फेरीतील पाचव्या सामन्यात श्रीलंकेने पाकिस्तानचा दोन गडी राखून पराभव केला. यासह श्रीलंकेच्या संघाने अंतिम फेरीत धडक मारली. पावसाने व्यत्यय आणलेल्या सामन्यात पाकिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करीत ४२ षटकांत २५२ धावा केल्या होत्या. डकवर्थ लुईस नियमानुसार श्रीलंकेसमोर २५२ धावांचे लक्ष्य होते. श्रीलंकेने शेवटच्या चेंडूवर आठ गडी गमावून लक्ष्य गाठले.

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ अगोदरच अंतिम फेरीत पोहचला असून आता अंतिम फेरीत भारताला श्रीलंका संघ आव्हान देण्यासाठी सज्ज झाला आहे.



अंतिम सामना १७ सप्टेंबर रोजी कोलंबो येथे होणार आहे.

२५३ धावांचे लक्ष्य घेऊन उतरलेल्या श्रीलंका संघाला पहिला धक्का २० धावांवर बसला. कुसल परेरा १७ धावा करून बाद झाला. त्याला शादाब खानच्या अचूक थ्रोने पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्यानंतर ७७ धावसंख्येवर संघाला दुसरा धक्का बसला. पथुम निसांका २९ धावा करून बाद झाला. शादाब खानने त्याला त्याच्याच चेंडूवर झेलबाद केले. यानंतर श्रीलंका संघाची १७७ धावांवर तिसरी विकेट पडली. सदिरा समरविक्रमा ४८ धावा करून बाद झाली. त्याने कुसल मेंडिससोबत शतकी भागीदारी केली. श्रीलंकेची चौथी विकेट २१० धावांवर पडली. कुसल मेंडिस ८७ चेंडूत ९१ धावा करून बाद झाला. इफ्तिखार अहमदच्या चेंडूवर मोहम्मद हारिसने शानदार झेल घेतला. मेंडिसने आठ चौकार आणि एक षटकार लगावला. २२२ धावांच्या स्कोअरवर श्रीलंकेची पाचवी विकेट पडली. कर्णधार दासुन शनाका दोन धावा करून बाद झाला.

कुसल मेंडिस श्रीलंकेच्या संघाला विजयाच्या दिशेने नेण्यासाठी एका टोकाकडून सातत्याने प्रयत्न करीत होता, पण त्याचदरम्यान त्याने ९१ धावांच्या वैयक्तिक धावसंख्येवर आपली विकेट गमावली. चारिथ असलंकाने एका टोकापासून डावावर नियंत्रण ठेवले आणि डावाच्या शेवटच्या चेंडूवर विजय मिळवून परतला. या सामन्यात चरित असलंकाने ४९ धावांची नाबाद खेळी खेळली. पाकिस्तानकडून इफ्तिखार अहमदने तीन आणि शाहीन आफ्रिदीने दोन बळी घेतले.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तान संघाने ४२ षटकांत आठ गडी गमावून २५२ धावा केल्या होत्या. डकवर्थ लुईस नियमानुसार श्रीलंकेसमोर २५३ धावांचे लक्ष्य होते. पाकिस्तानकडून मोहम्मद रिझवानने सर्वाधिक नाबाद ८६ धावा केल्या. अब्दुल्ला शफीकने ५२ धावांची खेळी केली. इफ्तिखारने ४७ धावांचे योगदान दिले. त्याने रिझवानसोबत शतकी भागीदारी करत सामन्यात पाकिस्तानचे दमदार पुनरागमन केले. श्रीलंकेकडून पाथिरानाने तीन आणि मदुशनने दोन विकेट्स मिळाल्या. तिक्षणा आणि वेल्लालगे यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

# राष्ट्रीय वरिष्ठ तायक्कांडो स्पर्धेत महाराष्ट्र संघाला विजेतेपद




**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

आसामची राजधानी गुवाहाटी येथे झालेल्या ३९व्या राष्ट्रीय सीनियर क्योरोगी तायक्कांदो स्पर्धा व बारावी राष्ट्रीय सीनियर पुमसे तायक्कांडो स्पर्धेत महाराष्ट्र संघाने सर्वाधिक पदकांसह प्रथम स्थान पटकाविले आहे. गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील १० खेळाडूंची निवड झाली असल्याची माहिती तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबईचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, महासचिव मिलिंद पठारे व सुभाष पाटील यांनी दिली.

वरिष्ठ गटात राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्रातील खेळाडूंनी चार सुवर्णपदक जिंकणे हे प्रथमच घडले आहे. शिवम शेट्टी, अभिजीत खोपडे, श्रीनिधी काटकर व निशिता कोतवाल यांनी सुवर्ण कामगिरी करून इतिहास घडवला. नम्रता तायडे, स्वराज शिंदे व प्रसाद पाटील यांनी कांस्यपदक जिंकले. पुमसे प्रकारामध्ये वैयक्तिक ६० वर्ष गटात मनीषा गरवालिया, ३० वर्षांखालील गटात मृणाली हरणेकर यांनी रौप्यपदक जिंकले. वंश ठाकूर, शिवम भोसले व तनिष मालवणकर यांनीही रौप्यपदके जिंकली.

महाराष्ट्र टीम प्रमुख तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रवीण बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभागी झालेल्या संघाने चांगली कामगिरी केली. महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक म्हणून काम पाहत असलेले प्रवीण सोनकुल यांना तायक्कांडो फेडरेशन ऑफ इंडियाकडून बेस्ट क्योरोगी कोच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र संघाचे कोच म्हणून सोनकुल यांच्यासोबत जयेश बाविस्कर, संघ व्यवस्थापक प्रमोद कदम, पुमसे कोच रॉबिन, मॅनेजर विद्या जाधव तसेच अमोल तोडणकर, अरविंद निशाद आदी सर्व सपोर्टिंग कोच यांनीही महत्त्वाची जबाबदारी निभावली.

तायक्कांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, महासचिव तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते मिलिंद पठारे, कोषाध्यक्ष वेंकटेश्वर कररा, उपाध्यक्ष प्रवीण बोरसे व धुलीचंद मेश्राम, सचिव सुभाष पाटील तसेच राज्य संघटनेचे सदस्य नीरज बोरसे, अजित घारगे, सतीश खेमसकर यांनी सर्व पदकविजेते खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.

### राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

आसाम येथील राष्ट्रीय सीनियर तायक्कांडो स्पर्धेतील सर्व पदक विजेत्या खेळाडूंची गोवा येथे ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. अभिजीत खोपडे (५८ किलो), शिवम शेट्टी (६३ किलो), स्वराज शिंदे, (६८ किलो), प्रसाद पाटील (७४ किलो), श्रीनिधी काटकर (८७ किलो), साक्षी पाटील, (४६ किलो), मृणाल वैद्य (४९ किलो), निशिता कोतवाल (५३ किलो), भारती मोरे (६२ किलो), नम्रता तायडे (७३ किलो) या सर्व खेळाडूंची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली असल्याची माहिती तायक्कांडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबईचे महासचिव मिलिंद पठारे यांनी दिली.

# आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धेत देशपांडे चेस अकॅडमीचे यश



**माणगाव : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील लोधीवली येथे रायगड जिल्हास्तरीय आंतरशालेय बुद्धिबळ स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत माणगाव तालुक्यातील गोरेगावच्या देशपांडे चेस अकॅडमीचे वर्चस्व दिसून आले.

या स्पर्धेत मुलांमधून १४ वर्षाच्या गटात सर्वेश गांगरे, काशीफ म्हाळुणकर, कृष्णा बनकर, वेदांत मेथा, हरिओम शहा यांनी अनुक्रमे पहिले पाच क्रमांक पटकाविले. १७ वर्षाच्या गटात चंदन जंगम, परम झा, गंधार माळी, विनीत प्रसाद, तेजस जगदाळे यांनी अनुक्रमे पहिले पाच क्रमांक प्राप्त केले. मुलींमधून १४ वर्षाच्या गटात अपेक्षा मार्बल, अलिषा शेख, आर्या जाधव, भार्गवी नायडू, आर्या पानसरे यांनी अनुक्रमे पहिले पाच क्रमांक मिळविले, तर १७ वर्षाच्या गटात पूर्वा पवार, ऋतुजा नेटक, जिया ठाकूर, शीफा शेख, प्रिया पवार यांनी अनुक्रमे पहिले पाच क्रमांक आपल्या नावे केले आहेत.

या सर्व स्पर्धकांची मुंबई विभाग स्तरावर होणाऱ्या बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष विलास म्हात्रे तसेच नंदकुमार पालवे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मुंबई विभागीय कुस्ती स्पर्धेत ‘सीकेटी’चा यश पाटील उपविजेता

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्य क्रीडा व युवक संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा कार्यालय रायगड आणि पोलीस मुख्यालय नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कळंबोलीतील पोलीस मुख्यालय येथे झालेल्या मुंबई विभागस्तरीय कुस्ती स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या यश कृष्णा पाटील (बारावी विज्ञान) याने उपविजेतेपद पटकाविले.

या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, स्वाती पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**अहमदनगर : रयत शिक्षण संस्थेच्या श्रीरामपूर येथील स्व. सौ. साकरबेन करमशीभाई सोमैय्या प्राथमिक विद्यामंदिर व संस्कार केंद्रात साने गुरुजी मुक्तद्वार वाचनालय व अवकाश विज्ञान प्रयोगशाळेचे उद्घाटन आणि बहुउद्देशीय सभागृहावरील दुसऱ्या मजल्याचे भूमिपूजन ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते, उत्तर विभागाचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मीनाताई जगधने यांच्या अध्यक्षतेखाली झाले.**













**पनवेल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका भवन कळंबोली शहरात सुरू झाले असून येथे पनवेल तालुका भिमशक्ती संघटनेच्या वतीने एक हजार स्पर्धा पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या पुस्तकांचे लोकार्पण भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी झाले.**

# हरमनप्रीत कौर ‘टाईम्स लिस्ट ऑफ १०० लीडर’मध्ये

**मुंबई** : भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरचा टाईम्स लिस्ट ऑफ १०० लीडर यादीत समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या यादीतील हरमनप्रीत कौर ही एकमेव भारतीय क्रिकेटर आहे. हरमनप्रीतचा समावेश हा इनोव्हेटर्स या श्रेणीत करण्यात आला आहे. हरमनप्रीतसोबत या यादीत एन्जल रीसे, मेट्रो बूमिन, केट रायडर, मीरा मूर्ती आणि जेम्स मेयनार्ड यांचादेखील समावेश आहे.

हरमनप्रीतच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने २०२२च्या राष्ट्रकुल स्पर्धेत फायनलमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर २०२३च्या टी-२० वर्ल्डकपमध्ये भारतीय संघ सेमीफायनलमध्ये पोहचला. याचबरोबर पहिल्या महिला प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सला विजेतेपदही पटकावून दिले. आता कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघ एशियन गेम्समध्ये आपला दबदबा निर्माण करण्यासाठी सज्ज झाला आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com